## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांच्याशी सलग्नित

**शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे**

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

## इतिहास विभाग

**यांना**

**तृतीय वर्ष कला या पदवी करिता सादर करावयाचा संशोधन प्रकल्प**

# “श्री संत गोरोबा काका : जीवन व कार्य”


**सादरकर्ता**

**तेजस प्रभाकर घाटूळे**

विद्यार्थी, तृतीय वर्ष कला

**मार्गदर्शक**

**लेफ्ट. डॉ. अर्चना धनराज टाक**

सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख

**डॉ. महादेव गव्हाणे**

प्राचार्य

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),

लातूर- ४१३५१२.


एप्रिल २०२३

# प्रतिज्ञापत्र

**"श्री. संत गोरोबा काका : जीवन व कार्य"** या विषयावरील प्रस्तुत प्रकल्प मी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर यांच्या तृतीय वर्ष कला या पदवीसाठी लिहिलेला आहे. या प्रकल्पात समाविष्ट करण्यात आलेले कार्य माझ्या स्वतःच्या प्रयत्नांचे फलित आहे. त्यासाठी माझ्या मार्गदर्शकांकडून मिळालेले मार्गदर्शन आणि यापूर्वी झालेल्या संशोधनांचे संदर्भ याशिवाय कशाचीही मदत घेण्यात आली नाही. उपयोगात आणलेल्या संदर्भांचा योग्य निर्देश करण्यात आला आहे. हा प्रकल्प अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही व कोणत्याही परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

**Exam Seat No.:** RAS2360017

**स्थळ:** लातूर.

**दिनांक: ०६/०४/२०२३.**

**तेजस प्रभाकर घाटूळे**
विद्यार्थी
तृतीय वर्ष कला
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांच्याशी सलग्नित

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

## इतिहास विभाग

तृतीय वर्ष कला

२०२२-२३

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, तेजस प्रभाकर घाटूळे यांनी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर यांच्या तृतीय वर्ष कला या पदवीसाठी सादर केलेल्या "श्री. संत गोरोबा काका : जीवन व कार्य" हा संशोधन प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. प्रकल्प लेखनात ज्या संदर्भ साधनांचा आधार घेण्यात आला आहे, त्याचा यथोचित निर्देश केला आहे. तेजस प्रभाकर घाटूळे यांनी हा प्रकल्प स्वतंत्ररित्या लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात, कोणत्याही अन्य परिक्षेसाठी सादर केला नाही. सदरचा प्रकल्प राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष कला (Bachelor of Arts) या पदवीसाठी सादर करण्याची माझी अनुमती आहे.

**Exam Seat No.:** RAS2360017

**स्थळ**: लातूर

**दिनांक:** ०६/०४/२०२३

**मार्गदर्शक**

**लेफ्ट. डॉ. अर्चना धनराज टाक**
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख
इतिहास विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**डॉ. महादेव गव्हाणे**
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
पिन कोड – ४१३५१२

# ऋणनिर्देश...

आयुष्यात अनेक लोक हे आपल्याला भेटत असतात, जेव्हा एखादे चांगले काम करण्यासाठी आपण हातात घेतो, तेव्हा काही लोक ते काम पूर्ण करण्यासाठी सहकार्य करत असतात, तर काही लोक त्या कामात अडचणी कशा निर्माण होतील याची वाट पाहत असतात. परंतु अशा चांगल्या कामात मला साथ देणारे, मला प्रोत्साहन देणारे, मला सहकार्य करणारे अनेकजण आहेत, त्यांचा उल्लेख केल्याशिवाय ह्या प्रकल्प अभ्यासास पुर्णत्व येणार नाही.

कोणतेही कार्य करण्याचे निश्चित केल्यास त्या कार्याचा संकल्प व्यवस्थिपणे पूर्ण होण्यासाठी त्या व्यक्तीला स्वतः प्रयत्न करावे लागतात, परंतु आसपासच्या अन्य व्यक्तींचा मोलाचा सहभाग, सहकार्य असल्याशिवय ते शक्य होत नाही. प्रस्तुत प्रकल्प अभ्यासाचा विषय निश्चित करण्यापासून ते प्रकल्प अभ्यास कार्य पूर्णत्वास नेण्यापर्यंत अनेकांचे अनेक प्रकारे अत्यंत अनमोल सहकार्य लाभले आहे. याठिकाणी त्यांचे आभार मानने उचित ठरेल असे मला वाटते.

ऋषितुल्य व्यक्तिमत्व असलेले शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉ. गोपाळरावजी पाटील साहेब, उपाध्यक्ष आदरणीय डॉ. पी. आर. देशमुख सर, लातूर पॅटर्नचे जनक असलेले संस्थेचे सचिव आदरणीय प्राचार्य अनिरुद्ध जाधव सर, सहसचिव आदरणीय श्री. गोपाळ शिंदे सर, सहसचिव आदरणीय श्री. सुनील सोनवणे सर, सदस्य आदरणीय डॉ. रावसाहेब कावळे सर यांच्या आशीर्वादाचे हात माझ्या डोक्यावर असल्यामुळेच मी हे प्रकल्प लेखन कार्य पूर्ण करू शकलो.

प्रत्येक चांगल्या कामासाठी आम्हां सर्व विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणारे व तितक्याच कर्तव्यदक्षपणाने आमच्या चुका निदर्शनास आणुन देणारे प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेले, आमचे पूज्यनीय प्रेरणास्थान असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. महादेव गव्हाणे सर आणि उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे सर यांनी मला सतत दिलेले प्रोत्साहन व त्यांनी केलेले सहकार्य याबद्दल मी त्यांचे आभार न मानता त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करीन.

कोणत्याही कार्याची पुर्तता होण्यासाठी उत्कृष्ट व चांगले मार्गदर्शन मिळणे आवश्यक असते. असेच मार्गदर्शक मला मिळाले, राजर्षी शाहू महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख लेफ्ट. डॉ. अर्चना टाक यांनी संपूर्ण प्रकल्प अभ्यास प्रक्रियेमध्ये केलेल्या उत्कृष्ट, अचुक व मौलिक मार्गदर्शनामुळेच मी प्रकल्प लेखन कार्य पूर्ण करू शकलो. त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून, प्रोत्साहन देऊन, वेळ, काळ व स्थळाचे बंधन न ठेवता निरपेक्ष व कर्तव्यबुध्दीने मार्गदर्शन केलेले आहे. तसेच त्यांनी या संपूर्ण प्रकल्पाची छपाई अल्पवेळेत व सुबकपणे विनामुल्य करून दिल्यामुळेच हे कार्य निहित वेळेत पूर्ण होऊ शकले. त्यामुळे मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

कुटुंबाच्या सहकार्याशिवाय कोणतेही काम करणे कठीण असते. कुटुंबाकडून आपल्याला मानसिक आधार मिळत असतो. असा मानसिक आधार दिल्याबद्दल मी माझे पूज्यनीय आई-वडील सौ. अनिता व श्री. प्रभाकर घाटूळे यांचे मनापासून आभार मानतो. तसेच माझी बहिण कु. प्रियंका, भाऊ स्वप्नील तसेच भावाप्रमाणेच सतत पाठीशी उभे असलेले माझे मित्र संतोष इंद्राळे, प्रवीण येरनाले व विवेक भोसले यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचेही मनापासून आभार मानतो.

**धन्यवाद !!!**

**तेजस प्रभाकर घाटूळे**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **१** | **प्रकल्प अभ्यास पद्धती** | **१-६** |
| १ | प्रस्तावना | १-३ |
| २ | प्रकल्प अभ्यास विषयाची निवड | ३ |
| ३ | पूर्व अभ्यासाचा आढावा | ३ |
| ४ | प्रकल्प अभ्यास विषयाची गरज | ३ |
| ५ | प्रकल्प अभ्यास विषयाचे महत्व | ३-४ |
| ६ | समस्या विधान | ४ |
| ७ | प्रकल्प अभ्यास विषयाचे उद्देश | ४ |
| ८ | प्रकल्प अभ्यासाची गृहीतके | ४ |
| ९ | प्रकल्प अभ्यास प्रश्न | ४-५ |
| १० | प्रकल्प विषयाची व्याप्ती | ५ |
| ११ | प्रकल्प अभ्यासाची परिमर्यादा | ५ |
| १२ | प्रकल्प अभ्यासाची मर्यादा | ५ |
| १३ | माहिती संकलनाचे स्त्रोत | ५ |
| १४ | प्रकरण विभागणी | ५-६ |
| **२** | **वारकरी संप्रदाय-स्वरूप व तत्वज्ञान** | **८-१६** |
| १ | वारी आणि वारकरी | ८ |
| २ | वारकऱ्यांची लक्षणे | ८ |
| ३ | वारकरी संप्रदायाचा उगम व प्रवाह | ८ |
| ४ | वारकरी संप्रदायाचे कार्य | ८-१० |
| ५ | वारकरी संप्रदाय-स्वरूप व तत्वज्ञान | १०-१६ |
| **३** | **वाङ्मयातून समाजप्रबोधन** | **१८-३५** |
| **४** | **उपसंहार** | **३७-४०** |
|  | **संदर्भ सूची** | **४१** |
|  | **परिशिष्ट** | **I-III** |
|  | **छायाचित्रे** | **I-III** |

# प्रकरण पहिले :
# प्रकल्प अभ्यास पद्धती

# प्रकरण पहिले

## प्रकल्प अभ्यास पद्धती

### १. प्रस्तावना :-

माझ्या संशोधनाचा विषय **"श्री. संत गोरोबा काका : जीवन व कार्य"** हा आहे. सदरील संशोधनाचे काम इतिहास विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर यांच्या अंतर्गत केले आहे. यात तेर येथील श्री. संत गोरोबा काका यांच्या जीवन व कार्य यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. संत गोरा कुंभार यांच्या जीवन आणि कार्याचा परिचय करून देणे, हे प्रस्तुत संशोधनाचे मुख्य प्रयोजन आहे.

श्री. संत गोरा कुंभार हे गोरोबा काका या नावाने देखील ओळखले जातात. हे भक्ती चळवळ आणि महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाशी संबंधित असलेले हिंदू संत होते. ते पंढरपूरच्या विठ्ठलाचे खूप मोठे भक्त होते. तसेच त्यांचा मडके बनविण्याचा व्यवसाय होता, कारण जातीने ते कुंभार होते. श्री. संत गोरोबा काका यांनी इतर संतासह अनेक अभंग लिहिले आणि गायले. संत गोरोबा काका हे एक थोर संत होते. त्यांचे जीवन, भक्ती आणि अभंग सर्वसामान्यांना शेकडो वर्षापासून प्रेरणादायी ठरलेले आहेत. भक्तिमार्गातून समाजाचे प्रबोधन करीत त्यांनी वारकरी संप्रदायाची भागवत धर्माची पताका फडकावीत ठेवली.

श्री. संत गोरा कुंभार हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत होते. ते नामदेव आणि ज्ञानेश्वर यांचे समकालीन होते. संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांच्याइतकेच त्यांचे कार्य मोठे आहे. परंतु काळाच्या ओघात ते लुप्त झालेले दिसून येत आहे. त्यामुळे ते लुप्त होत चाललेले कार्य लोकांसमोर आणणे हे देखील या संशोधनाचे एक मुख्य प्रयोजन आहे.

सन्मणिलाला या ग्रंथात कविवर्य मोरोपंत गोरोबाकाका यांच्याविषयी मोठ्या आदरभावे म्हणतात,

गोरा ज्या म्हणती त्या स्मरूनि सुखी तूं मना कुलाला हो।
थे भक्तीचा जयाची मति संसारी अनाकुला ला हो ।[१]

मराठी भाषेचा उदय हा सातवाहनकालीन प्राकृत भाषेशी संबंधित मानला जातो. मराठीचे प्राचीनत्व हे सातवाहन काळापर्यंत जात असले तरी मोठ्या प्रमाणातील वाङ्मयनिर्मिती आणि आजच्या मराठीच्या जवळचे रूप मात्र १२ व्या शतकातील भक्तिवाङ्मयात सापडते. याच काळात श्री. संत गोरोबा काका होऊन गेले. त्यापूर्वी

वेदविद्यासंपन्न अशी संस्कृत भाषा लोकांमध्ये मान्यताप्राप्त भाषा होती. संस्कृत या भाषेतच धर्मग्रंथ हे रचले गेले. वेद, पुराणे, अरण्यके, उपनिषदे या ग्रंथातील अर्थ संस्कृत जाणणारा वर्गच समजू शकत होता. महाराष्ट्रातील पहिली भक्तीवाङ्मय चळवळ ही १२ व्या शतकात यादवांच्या कारकिर्दीमध्ये अस्तित्वात असल्याच्या खुणा सापडतात, त्या म्हणजे महानुभाव संप्रदाय होय. या महानुभाव संप्रदायाबरोबरच वारकरी संप्रदायाचा उदय झाला. जीव आणि परमात्मा या दोन्हींचे एकत्व जाणून अद्वैत अशा तत्वज्ञानाची मांडणी या संप्रदायाने केली. वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वरापासून ते संत तुकाराम यांपर्यंतच्या सर्व संतांनी नितीतत्व आणि सदाचार हाच धर्म मानला. त्यांनी पंढरपूरच्या विठ्ठलाला दैवत मानले. त्यात संत गोरोबा काका हे विठ्ठलाचे सर्वात मोठे भक्त होते. सर्व जातीतील लोकांना नामस्मरण आणि वाङ्मय निर्मितीचा अधिकार देवून सामाजिक समता स्थापन करण्याचे काम या वारकरी संतांनी केले. त्यामुळे अस्पृश्य वर्गातून अनेक संत निर्माण होऊन त्यांनी वाङ्मय निर्माण केले. लोकभाषेचा स्वीकार करून वाङ्मय निर्माण करणाऱ्या संतांमध्ये सेना न्हावी, बंका महार, सखा महार, चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार, परिसा भागवत, संत तुकाराम इत्यादी तर स्त्री संतामध्ये संत जनाबाई, संत सखुबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत भागू महारीन इत्यादी संतानी आपले अनुभव, दैन्य, दुःख अभंगाच्या माध्यमातून सर्वप्रथम मांडले. त्यात संत गोरा कुंभार ज्यांना गोरोबा काका म्हणूनही ओळखले जाते हे विठ्ठलाचे खूप मोठे भक्त आणि महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाशी संबंधित हिंदू संत होते. संत गोरा कुंभार आणि इतर संतांनी अभंगाची अनेक गाणी लिहिली आणि गायली. वारकरी संप्रदायाचे मुख्य तत्व म्हणजे दररोज कीर्तन करणे आणि त्यातून समाजास योग्य दिशा दाखविणे. संत गोरोबा काका सर्व सामान्य असल्यामुळे ते अधिकच जवळचे वाटतात. एका सर्वसामान्य कुटुंबात त्यांचे संपूर्ण आयुष्य व्यतीत झाले. विठु माऊली प्रती आपला भक्तीभाव जपत गोरोबा काकांनी आपला संसारदेखील परमार्थमय केला. संत गोरा कुंभार हे विठ्ठलाचे इतके मोठे भक्त होते की ते आपले नित्य कर्म करत असताना देखील विठ्ठलाचे नामस्मरण करण्यात तल्लीन होत असत.

प्रख्यात मराठी साहित्यिक डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "गोरोबाकाकांचे कवित्व अवघ्या वीस अभंगाइतकेच उपलब्ध आहे. पण एखाद्या लहानशा जागेत एखादी गगनचुंबी इमारत उभारलेली दृष्टीस पडावी, त्याप्रमाणे अवघ्या वीस अभंगांच्या मर्यादेत त्यांच्या परमार्थिक विचारांनी घेतलेल्या उड्डाणातील भव्यता आणि दिव्यता सहज प्रतीत होण्यासारखी आहे."[२]

पुढे ते म्हणतात, "श्रुती जेथून परतल्या असा अलौकिक आध्यात्मिक अनुभव हा गोरोबांच्या अभंगाचा विषय. सर्वच संतवाणीचा हाच विषय."[३]

'प्राचीन वाङ्मयाचा इतिहास' या आपल्या पुस्तकात श्री. नशिराबादकर म्हणतात, “गोरोबांच्या अत्यंत साध्या अशा अभंग रचनेत संपन्न आणि सात्विक असा ज्ञानानुभव साठविलेला आहे.”[४]

**२. प्रकल्प अभ्यास विषयाची निवड :-**

प्रस्तुत अभ्यासासाठी तेर येथील वारकरी संप्रदायातील तसेच विठु माऊलीचे सर्वात मोठे भक्त असलेले एक थोर संत यांच्यावर आधारित **“श्री. संत गोरोबा काका : जीवन व कार्य”** या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

**३. पूर्व अभ्यासाचा आढावा :-**

तेर या गावातील थोर संत श्री. संत गोरा कुंभार यांचे जीवन आणि कार्याचा अभ्यास हा विषय मी प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला आहे. संशोधनासाठी विषय निवडत असताना असा विषय निवडला जातो अथवा निश्चित केला जातो की, ज्या विषयाचा अद्यापपावेतो सर्वांगाने अभ्यास झालेला नाही अथवा तो विषय संशोधनासाठी म्हणून आत्तापर्यंत निवडलेलाच नाही. तसेच ज्या विषयासंबंधी प्रकाशित आणि अप्रकाशित स्वरूपाची संदर्भसाधने विपुल प्रमाणावर प्राप्त होऊ शकतील, असा विषय संशोधनासाठी निश्चित केला जातो. म्हणुन तेर या ठिकाणच्या श्री. संत गोरा कुंभार यांच्यावर काही प्रमाणात संशोधन झाले आहे. पण ते सर्वांगाने झालेले नाही.

**४. प्रकल्प अभ्यासाची गरज: (Needs of the Research)**

**१.** इतर अभ्यासकांना कार्यप्रेरणा मिळवण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

**२.** या विषयावर कमी प्रमाणात अभ्यास झालेला आहे. त्यामुळे सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

**३.** महाराष्ट्राच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या समाजसुधारणा चळवळी सखोलपणे जाणून घ्यायच्या असतील तर सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

**४.** महाराष्ट्रातील प्रबोधनाचा इतिहास यासंदर्भात अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना अभ्यासाची दिशा मिळण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

**५. प्रकल्प अभ्यासाचे महत्व: (Significance of the Research)**

१) संत गोरोबा काका यांचे साहित्याच्या क्षेत्रातील योगदान समजण्याकरीता सदर विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

२) महाराष्ट्राच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या समाजसुधारणा चळवळीमध्ये संत गोरोबा काका यांच्या जीवन व साहित्याने कशा प्रकारे योगदान दिलेले आहे, हे समजण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

३) संत गोरोबा काका यांचे साहित्याच्या क्षेत्रातील योगदान सद्यस्थितीत प्रेरणादायी ठरविण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

**६. समस्या विधान :(Origin of the Research Problem)**

संत गोरोबा काका यांच्या साहित्याचा व कार्याचा महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या चळवळीच्या दृष्टीने अभ्यास करणे.

**७. प्रकल्प अभ्यास विषयाचे उद्देश :- (Objectives)**

१. तेराव्या व चौदाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. वारकरी संप्रदायाचा अभ्यास करणे.

३. संतांचे जीवन व त्यांनी निर्माण केलेले साहित्य यांची जीवनामध्ये काय उपयुक्तता आहे याचा अभ्यास करणे.

८. संत गोरोबा काका यांच्या साहित्याचा अभ्यास करणे.

**९. प्रकल्प अभ्यासाची गृहीतके:**

**१.** संत गोरोबा काका हे महाराष्ट्रातील संत परंपरेतील एक ज्येष्ठ संत होते..

**२.** महाराष्ट्राच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या समाजसुधारणा चळवळीवर संत गोरोबा काका यांच्या जीवन व साहित्याचा सकारात्मक प्रभाव पडलेला आहे.

१०. **प्रकल्प अभ्यास प्रश्न:**

**१.** संत साहित्य म्हणजे काय?

२. वारकरी संप्रदाय म्हणजे काय?

३. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात संत गोरोबा काका यांच्या कार्याने व साहित्याने कशा प्रकारे योगदान दिलेले आहे?

४. महाराष्ट्राच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या समाजसुधारणा चळवळीमध्ये संत गोरोबा काका यांच्या जीवन व साहित्याने कशा प्रकारे योगदान दिलेले आहे?

**११. प्रकल्प अभ्यासाची व्याप्ती: (Scope of the Research)**

१. प्रस्तुत अभ्यास हा महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक इतिहासाशी संबंधित आहे.

**१२. प्रकल्प अभ्यासाची परिमर्यादा: (De-Limitations of the Research)**

१. प्रस्तुत अभ्यासात फक्त महाराष्ट्र राज्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर या गावाचाच विचार केलेला आहे .

**१३.** प्रस्तुत अभ्यासात फक्त संत गोरोबा काका या एकाच संतांच्या जीवन कार्याचा व साहित्याचा विचार केलेला आहे.

**१४. प्रकल्प अभ्यासाची मर्यादा: (Limitations of the Research)**

१. प्रस्तुत अभ्यासासाठी वापरली जाणारी संदर्भ साधने संशोधक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार प्रमाणित करणार आहे.

२. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे संदर्भ साधनांचा अभ्यास व चिंतन यावर अवलंबून असणार आहेत.

**१५. माहिती संकलनाचे स्त्रोत:-**

प्रस्तुत प्रकल्पासाठी नव्याने साधने शोधून त्याआधारे अभ्यास करण्यात आलेला आहे. त्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

१. विविध संदर्भ ग्रंथ, चरित्र व आत्मचरित्रपर ग्रंथ यांचा वापर प्रस्तुत अभ्यासासाठी करण्यात आलेला आहे.

२. संकेतस्थळावरून प्रस्तुत अभ्यासासाठी माहिती मिळविण्यात आलेली आहे.

**१६. प्रकरण विभागणी :**

**प्रकरण १ : प्रकल्प अभ्यास पद्धती**

प्रस्तुत प्रकरणामध्ये या प्रकल्पाकरिता वापरण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचा आढावा घेण्यात आलेला आहे. संशोधनासाठी प्रस्तुत विषयाची निवड केल्यानंतर त्या विषयाचे महत्व, संशोधन विषयाची उद्दिष्टे, गृहीतके, व्याप्ती व मर्यादा मांडण्यात आली आहे. तसेच या विषयावर यापूर्वी संशोधन झालेले आहे किंवा नाही याची

पडताळणी करण्यात आली असता असे दिसून आले की, या विषयावरती पुर्णपणे संशोधन झालेले नाही. या विषयाचा सखोलपणे अभ्यास करण्यासाठी उपलब्ध असलेल्या साधनांचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण २ : वारकरी संप्रदाय - स्वरूप व तत्त्वज्ञान**

प्रस्तुत प्रकरणामध्ये वारकरी संप्रदायाचा अर्थ, त्याचे महत्त्व याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. तसेच वारकरी संप्रदायाचे कार्य त्याद्वारे वारकरी संप्रदायाने आपली पताका संपूर्ण भारतात कशाप्रकारे फडकावली आणि त्याचे स्वरूप कशाप्रकारचे आहे व त्याने दिलेली शिकवण, तत्वज्ञान याचा अभ्यास करण्यात अभिला आहे.

**प्रकरण ३ : श्री संत गोरा कुंभार - वाङ्मयातून समाज- प्रबोधन**

प्रस्तुत प्रकरणामध्ये श्री. संत गोरा कुंभार यांच्या वाङ्मयीन साहिन्यातून समाजाचे प्रबोधन त्यांनी कशाप्रकारे केले आहे हे सांगण्यात आले आहे.

**प्रकरण ४ : उपसंहार**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संपूर्ण प्रकल्पाचे सार मांडण्यात आले आहे.

****************************************************************************************************

**संदर्भ टिपा:**

१. प्रा. वेदालंकार वेदकुमार, म्हणे गोरा कुंभार (संक्षिप्त चरित्र व सार्थ अभंग संग्रह), विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृ.७.

२. तत्रैव, पृ. १४.

३. तत्रैव, पृ. १४.

४. तत्रैव, पृ. १४.

# प्रकरण दुसरे :
# वारकरी संप्रदाय - स्वरूप व तत्वज्ञान

## प्रकरण २

## वारकरी संप्रदाय - स्वरूप व तत्वज्ञान

**१. वारी आणि वारकरी:-**

वारी म्हणजे आषाढी व कार्तिकी शुद्ध एकादशीला विठ्ठलाच्या दर्शनासाठी आपापल्या गावाहून पंढरपूर येथे केलेली सामुहिक पदयात्रा होय. विठ्ठलाच्या दर्शनाने दुःखाला वारते आणि सुखाचा मार्ग दाखवते ती वारी अशी व्याख्या आपल्याला करता येईल. एकादशीला किंवा इतर पवित्र दिवशी जो नियमित वारी करतो, त्याला वारकरी किंवा माळकरी असे म्हणतात.

**२. वारक-यांची लक्षणे :-**

विठ्ठलाला प्रिय असलेल्या तुळशीची माळ गळयात घालणे, स्नान केल्यानंतर कपाळाला गोपीचंदनाचा टिळा लावणे, दररोज गावातील विठ्ठल मंदिरात जाऊन विठ्ठल दर्शन घेणे, हरिपाठ म्हणणे, संत साहित्याचे वाचन करणे, भजन किर्तनात सहभाग घेणे, सात्विक आहार घेणे, सदाचारी असणे, एकादशी व्रत करणे अशी वारकऱ्यांची साधारण लक्षणे असतात.

**३. वारकरी संप्रदायाचा उगम व प्रवाह :-**

विठ्ठलाच्या वारीला जाणाऱ्या लोकांच्या संप्रदायास वारकरी संप्रदाय म्हणतात. या संप्रदायाचा आद्यप्रवर्तक भक्त पुंडलिक समजला जातो. साधारणतः बाराव्या शतकात पंढरपुरास तीर्थक्षेत्राचे महत्त्व प्राप्त होऊन पांडुरंगाचे भक्त पंढरीची वारी करू लागले. संत ज्ञानेश्वरांच्या घराण्यात वारकरी संप्रदायाची परंपरा होती. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ संत भानुदास, संत तुकाराम, संत निळोबा, संत गोरा कुंभार, संत नारायण महाराज इत्यादींनी हाच प्रवाह पुढे चालू ठेवला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपासून ज्ञानोबा, तुकारामांच्या पालख्यांची परंपरा आहे. निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई, जनार्दन स्वामी यांच्या पालख्याही पंढरपुरास येतात. ज्ञानोबा- तुकारामांच्या नामाचा जयघोष करत, अभंग म्हणत, पारंपारिक खेळ खेळत या पालख्या महाराष्ट्राच्या विविध भागांमधून पंढरपूरला जातात.

**४. वारकरी संप्रदायाचे कार्य**

**१) अध्यात्मिक सुखाचा मार्ग :-**

आयुष्यात मोक्ष मिळवण्यासाठीच्या अनेक मार्गांपैकी भक्तिमार्ग हा सगळयात आचार-विचारांच्या दृष्टीने सोपा मार्ग आहे. वारकरी संप्रदायाने सर्वसामान्य कष्टकरी जनतेसाठी हा मार्ग उपलब्ध करून दिला. आपले नित्य कर्तव्य निष्ठेने करत असतानाच पुण्य मिळविण्यासाठी भगवंताचे नामस्मरण करणे, हे या संप्रदायाचे मुख्य तत्व आहे. भगवंताचे सतत स्मरण रहावे म्हणून वारकरी संप्रदायाचे भक्तगण गळयात सतत विष्णुप्रिय तुळशीची माळ घालतात. तिचा जपासाठीही उपयोग करतात. सात्विक आहार, सदाचरण आणि परोपकाराबरोबर परमार्थ ही या संप्रदायाची किंवा भागवत धर्माची शिकवण आहे. संसारातील बंधनातून, मोहमायेतून हळूहळू दूर होऊन, भजन-कीर्तनात रमून नामस्मरण करीत पांडुरंगाशी एकरूप व्हावे असा हा वारकरी संप्रदायाचा साधा आणि सरळ-सोपा भक्तिमार्ग आहे.

**२) भेदभाव व जातिभेदाविरुद्ध शिकवण व आचार :-**

वारकरी संप्रदायात भेदभाव विरहित सर्व जाती-धर्मांचे लोक सहभागी होतात. संपूर्ण वारीच्या काळात जातीभेद, विसरून एकत्र राहतात, खातात, पितात तसेच एकमेकांची सुखदुःख जाणून घेतात. त्यांच्यात आचार-विचारांचे अभिसरण होते. यामुळे नक्कीच जातीभेद नष्ट व्हायला मदत होते. संत ज्ञानेश्वरांनी या संप्रदायाची पताका हाती धरून सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्र करून वारीत सामील करून घेतले व अध्यात्मिक लोकशाही आणली. तत्कालीन समाज- रचनेतील तळागाळातील लोकांनाही विकासाची संधी मिळावी असे ज्ञानेश्वर आदी सर्वच संतांना मनापासून वाटत होते. हीच व्यापक परंपरा इतर संतांनीही पुढे चालू ठेवली. वारीतून या संप्रदायाची समाजभिमुखता दिसून येते. संत ज्ञानेश्वर, नामदेव शिंपी, तुकाराम वाणी, एकनाथ महाराज, संत गोरा कुंभार, चोखामेळा, सेना न्हावी, नरहरी सोनार, जनाबाई अशा वेगवेगळया स्तरातल्या संतांची परंपरा वारकरी संप्रदायान दिसून येते. संत तुकाराम, संत एकनाथ आणि इतर संतांचे जातिभेदाविरुद्धचे कार्य आपल्याला विविध घटनांतून माहित आहे, तसेच ते त्यांच्या अभंगातून व भारुडातून प्रकट होते.

**३) समाजप्रबोधन :-**

सर्वच संतांनी त्यांच्या आचरणातून व साहित्यातून समाजातील वाईट चालीरितीविरुद्ध व अंधश्रध्देविरुद्ध प्रहार केलेले आहेत. सनातन्यांनी केलेला छळ सोसूनही संत एकनाथ महाराज व संत तुकाराम महाराजांनी समाजप्रबोधनाचे कार्य सतत चालू ठेवले. वारकरी संप्रदायातील सर्वच संतांनी सनातन्यांनी चालविलेल्या सर्वसामान्य प्रजेच्या धार्मिक व आर्थिक शोषणाविरुद्ध प्रखर लढा दिलेला आहे. वारकरी संप्रदायाच्या या कार्याचे महाराष्ट्रावर मोठे उपकार आहेत. वारकरी संप्रदायाने निरक्षर कष्टकरी प्रजेच्या समाजप्रबोधनाचे मोठेच कार्य

कीर्तनातून केले आहे. वारकरी संप्रदायाचा अविभाज्य भाग असलेल्या कीर्तनासारखा लोक शिक्षणासाठी परिणामकारक असा दुसरा मार्ग नाही.

**४) धार्मिक पर्यटन :-**

एरवी धकाधकीच्या आयुष्यातून केवळ फिरण्यासाठी वेळ काढणे गरीब जनतेला कठीणच आहे. कष्टकरी जनतेला त्यांच्या नेहमीच्या कष्टमय जीवनातून थोडावेळ मोकळीक मिळून तेवढाच विरंगुळा मिळतो. पुढील कष्टमय आयुष्य जगण्याचे बळ मिळते. वेगवेगळा परिसर पाहायला मिळतो. त्या ठिकाणचा भूगोल, इतिहास व पर्यावरणाची ओळख होते. समजुतीच्या कक्षा रुंदावतात. वेगवेगळया चालीरितीची आणि लोकजीवनाची ओळख होते त्यामुळे मन विशाल होते. निश्चितपणे भगवंत भक्तीत लीन होता येते. हे एक प्रकारचे धार्मिक पर्यटनच आहे.

**५) धर्मरक्षण :-**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात संत रामदास स्वामी, संत तुकाराम महाराज यांनी सर्वसामान्य प्रजेला भक्तिमार्गाची गोडी लावून व वारकरी संप्रदायाचे संघटन करून धर्म संरक्षणाच्या कार्यास मोठाच हातभार लावला. मोगल आक्रमणाने सैरभैर झालेल्या समाजाला जगण्याची दिशा व बळ दिले. अन्यथा बऱ्याच लोकांचे धर्मांतरण झाले असते.

वारकरी संप्रदाय हा भोळयाभाबड्या लोकांचा विठ्ठलावर श्रद्धा असणाऱ्यांचा पण अंधश्रद्धा नसणाऱ्यांचा आहे. हा संप्रदाय सन्मार्गाने विहित कार्य करीत विठ्ठलाचे नामस्मरण करीत शेवटी पांडुरंग चरणी लीन होऊन मोक्ष मिळवण्याचा साधा सोपा मार्ग वारकऱ्यांना दाखवतो.

**५. वारकरी संप्रदायाचे स्वरूप व तत्वज्ञान :-**

भारतीय भक्ती संप्रदायामध्ये वारकरी संप्रदायाचे योगदान महत्त्वाचे आहे. पंढरपूरच्या श्री विठ्ठलाला दैवत मानणा-या वारकरी संप्रदायास संत ज्ञानोबा माऊली, संत नामदेव, संत गोरा कुंभार इत्यादी संतमंडळींनी लोकप्रियता मिळवून दिली. वारकर' म्हटला की आपल्या डोळयापुढे उभी राहते ती भक्तिरसात न्हाऊन निघालेली तल्लीन होवून टाळ मृदंगाच्या गजरात नाचनारी, गळयात तुळशीमाळ आणि कपाळी गंध-टिळा धारण करणारी प्रेमानंदाची एक साकार प्रतिमा आपल्या विठुमाऊलीचे एक तान्हे निरागस लेकरू आहे, वारकरी. हा वारकरी संप्रदाय अशा एक नव्हे, तर हजारो, लाखो भाविक लोकांचा समुदाय आहे. या संप्रदायाचा प्रसार आणि विस्तार महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यात तर आहेच, परंतु या क्षेत्राच्या सीमा ओलांडून भारताच्या कानाकोपऱ्यातही

पंढरपूरला पांडुरंगाची ही भक्त मंडळी निवास करते. प्रवासाच्या अंतरामुळे पंढरीची वारी करणे काहींना शक्य होत नसेल, पण संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली, तुकोबा अशा संतांच्या अभंग ओव्या गाऊन ही भक्तमंडळी आपल्या अंतरी भक्तिरसाचा आस्वाद घेते. पण अंतरंगी पांडुरंगाचे ध्यान करणारा विठ्ठलभक्त नियमाने दरवर्षी आषाढ, कार्तिक, चैत्र, माघ या महिन्यांच्या एका किंवा सर्व शुद्ध एकादशी तिथींना पंढरपूरची वारी करणारा वारकरी महाराष्ट्राच्या खेडोपाडी देऊळा राऊळा मध्ये जय जय रामकृष्ण हरी म्हणत नाचणारा वारकरी हा आपल्या पंढरीला भूलोकीचे वैकुंठ मानून व विठ्ठल भक्तीला मोक्ष प्राप्तीचे साधन समजून नित्यानंद विहार करतो. श्रेष्ठ समीक्षक श्री. शं. वा. दांडेकर यांनी वारकऱ्यांची पुढील शब्दांत व्याख्या केली आहे -

"आषाढी कार्तिकी, माधी अथवा चैत्री यापैकी एका शुद्ध एकादशीस गळयात तुळशीची माळ घालून नियमाने जी पंढरपुरास जाती तो पंढरीचा वारकरी म्हटला जातो व त्याच्या उपासनेचा जो मार्ग तो वारकरी पंथ होय."[१]

प्रत्येक वारकरी पंढरपूरची वारी वर्षातून किमान एकदा तरी करतोच, तथापि संत ज्ञानदेवांनी समाधी घेतल्या नंतर कार्तिक वैद्य एकादशीसही वारकरी आळंदीला जाऊ लागले. संत नामदेवांच्या (१२७०-१३५०) काळातच ही आळंदीवारी सुरू झाली, सासवड, त्र्यंबकेश्वर, पैठण, देहू, पिंपळनेर इत्यादी ठिकाणीही वारक-यांची यात्रा भरते. त्या-त्या स्थळी झालेल्या विशिष्ट संतांच्या वास्तव्यामुळे ही ठिकाणे पवित्र मानली गेली आहेत. तथापि विठ्ठलाच्या सर्व वाऱ्या शुद्ध पक्षातल्या असून भक्तांशी संबंधित असलेल्या स्थानी होणाऱ्या वाऱ्या वैद्य पक्षातल्या आहेत.

पंढरीची वारी पायीच करण्याचा प्रघात एके काळी होता व आजही अनेक वारकरी तो पाळतात. लाखो वारकरी प्रतिवर्षी पंढरपूर येथे जमतात. पंढरपूरला आल्यानंतर सर्व वारकरी चंद्रभागेत स्नान करून श्रीपांडुरंगाचे व पुंडलिकाचे दर्शन घेतात. पंढरपुरात आल्यावर पांडुरंगाचे दर्शन घेण्यापूर्वी भक्तराज पुंडलिकाचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. मग गाव प्रदिक्षणा होते. उरलेला वेळ भजन-कीर्तनात जातो. वारकरी कीर्तन हरिदासी कीर्तनविक्षा वेगळे असते. त्यात गाण्यापेक्षा भजनावर अधिक भर असतो. वारकरी कीर्तनाचीही पुर्वीची पध्दत आणि आजची पध्दत यात थोडा फरक आहे. देवळात जाऊन विठ्ठल दर्शन घेतल्यानंतर देवाला पाठ न दाखविता भजन करीत मागेमागे जाऊन चंद्रभागेच्या वाळवंटात यायचे आणि मग कीर्तनास आरंभ करायचा, ही जुनी पध्दत होती. वारकरी संप्रदायातील विख्यात कीर्तनकार विष्णुबुवा जोग यांनी ही पद्धत बदलली. कारण अशी कीर्तनपध्दती गावोगावी अवलंबिणे शक्य नव्हते. वारकरी कीर्तनाचे पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग विष्णुबुवा जोगांनीच

केले. मुळात वारकरी कीर्तने नदीच्या वाळवंटात होत, त्याचे पुरावे संतांच्या अभंगातून मिळतात. कीर्तनात निरूपण असल्यामुळे त्या कीर्तनास कीर्तन म्हणण्या ऐवजी निरुपण म्हणण्याची पद्धत वारकरी संप्रदायात आहे.

संत नामदेव यांनी आपल्या अभंगवाणीत वारकरी यांचे वर्णन अशा रूपात शब्दबध्द केले आहे-

आले आले रे हरीचे डोंगर ।
वीर वारकरी पंढरीचे ॥
ज्यांची चरण धुळी उधळे गगनपंथे
ब्रह्मादिकां तेथे जाली दाटी ।।
एकमेकां पुढे लवविना माथे ।
म्हणतील आम्हां ने लागी रज ।।
भक्तिप्रेमभाव भरले ज्यांच्या अंगी।
नाचती हरिरंगी नेणती लाजु ॥[२]

या भक्तिसंप्रदायाचा पाया घातला. संत ज्ञानेश्वर ज्यांनी संत नामदेवाने त्याचा विस्तार केला आणि तुकोबारायाने या भक्तिमंदिरावर कळस चढविला, संत बहिणाबाई यांनी म्हटले आहे,

“संतकृपा झाली । इमारत फळा आली।
ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।
नामा तयाचा किंकर । तेणे केला विस्तार।
जनार्दन एकनाथा खांब दिला भागवत
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश”[३]

कालविभाजनाच्या दृष्टीने विचार केल्यास वारकरी संप्रदायाच्या इतिहास खालील पाच विभागात पुढीलप्रकारे सांगता येईल.

१. भक्त पुंडलिक ते ज्ञानदेव,
२. ज्ञानदेव व नामदेवाचा काळ,
३. भानुदास, व एकनाथ यांचा काळ,

४. तुकारामांचा काळ,

५. तुकारामोत्तर काळ,

ज्ञानदेवे रचिला पाया हे जरी खरे असले तरीही, विद्वानांच्या मते संप्रदाय-प्रवर्तकाचा मान भक्तश्रेष्ठ पुंडलिकास द्यावा लागेल. संत ज्ञानेश्वर यांनी वारकरी पंथाचा पाया घातला म्हणजे त्यास तत्वज्ञानाचे अधिष्ठान दिले. भक्त पुंडलिकाच्या भावभक्तीला वशीभूत होऊन पांडुरंग त्यांच्याकडे येऊन विटेवर उभा राहीला. इसवी सनाच्या तेराव्या शतकाचा उत्तरार्ध व चौदाव्या शतकाचा पूर्वार्ध म्हणजे सुवर्णाक्षरांनी लिहिलेले अक्षर वाङ्मय आहे, हे निर्विवाद. संत ज्ञानदेव, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, परिसा भागवत, जनाबाई, चोखामेळा इत्यादी संत मंडळी याच काळात झाली असून त्यांच्या वाङ्मयाला भाक्तरसाच्या व वाङ्मयीन मुल्याच्या दृष्टीने तोड नसावी, असेच म्हणावे वाटते. ज्ञानदेवाचे स्फूर्ति स्थान नाथ संप्रदाय होते, परंतु तो केवळ योगमार्ग होता, त्यात भक्तिमार्गाला फारसे स्थान नव्हते. संत निवृत्तीनाथ ज्ञानदेवादीनी आपल्या योगसाधनेसह भक्तिरसाच्या क्षीण स्त्रोताला नवीन आशय दिला, त्या स्त्रोतास निर्झर रूपाने प्रवाहित करून त्यास महानदीचे रूप प्राप्त करून दिले.

त्यानंतर संत भानुदास व संत एकनाथ या संतांनी भक्तिसरितेमध्ये स्नान करण्याची संधी सर्वसामान्यांना प्राप्त करून दिली. विजयनगरच्या राजाने जी विठ्ठलमूर्ती । आपल्या राजधानीत नेली होती, ती मूर्ती संत भानुदास यांनी आपल्या भक्तीच्या बळावर परत पंढरपूरला आणली. अशी आख्यायिका आहे. महाराष्ट्रात स्वराज्याचा लोप झाल्यानंतर परकीय आक्रमण व जुलमी राजवटीच्या जोखडाखाली त्रस्त झालेल्या दुःखी सामान्य जनांसाठी ज्ञानाची व भक्तीची दारे उघडी करून मोठा आधार दिला तो म्हणजे, संत एकनाथांनी, धर्माच्या नावाखाली माजलेल्या अधर्मामुळेच जो समाज पीडला गेला होता, त्यास संत एकनाथ यांनी आपल्या एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, रूक्मीणी स्वयंवर, हस्तामलक, शुकाष्टक, आनंदलहरी या उत्कृष्ट ग्रंथाद्वारे तसेच भारूड व अभंग यादवारे एक वेगळाच दिलासा दिला. कीर्तनासारख्या लोकप्रिय व प्रभावी साधनाद्वारे संत एकनाथ यांनी जी लोकजागृती केली, ती केवळ अनमोल आहे.

त्यानंतर संत तुकारामांच्या काळात भागवतधर्म मंदिराच्या या इमारतीवर कळस चढविला गेला. तुकोबाराय म्हणजे थोर पुरुष, त्यांच्या सारखा उंचीचा थोर वारकरी त्यांच्यानंतर झाला नाही, म्हणूनच त्यांना 'भक्तीमंदिराचा कळस ही उपमा खऱ्या अर्थाने शोभते. तुकोबारायांनी परमार्थाची व्यवहारधर्माशी सांगड घातली, तसेच भ्रामक समजुती व भक्ती प्रेमाला बाधक अशा अपप्रवृत्तीचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. त्यांची सरस

अभंगवाणी महाराष्ट्राच्या गावोगावी कीर्तन, भजन सप्ताह या उपक्रमांतून आज शेकडो वर्षे गायिली जात आहेत, ती त्या अभंगातील अवीट गोडी व विठ्ठल प्रेमामुळे, आजही वारकरी संप्रदायाची भक्तिगंगा, गावोगावच्या देवळात, धरोधरी असलेल्या अभंगगाथाच्या रूपात व अध्यात्म पूरित हृदयातून वाहत आहे.

यापसंगी वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची चर्चा देखील अस्थानी ठरणार नाही. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकोबांची गाथा ही ग्रंथत्रयी म्हणजे वारकरी संप्रदाय याची प्रस्थानत्रयी आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ज्ञानदेवांनी या तत्वज्ञानास जी एकसूत्रता दिली. त्यास अनुसरून असे दिसुन येईल की,

१. परमात्मा स्वयंप्रकाशी व स्वसंवैद्य आहे. तो सद्रुप असून त्याची सत्ता स्वयंसिद्ध आहे. तो सत् + चित् + आनंद यो गुणांनी युक्त, म्हणूनच सच्चिदानंद आहे.

कांती काठिण्य कनक। तिन्ही मिळोनी एक ।।
द्राव गोडी पियूख। पियखाचे जेवी।। (अमृतानुभव)[४]

२. जड सृष्टीप्रमाणे असंख्य जीवही परमेश्वराने प्रगट केले. जीव हा परमात्म्याचाच चिन्मय अंश आहे.
३. परमात्मा आत्मप्रीतीसाठी आपणच प्रभू व जीव होतो.
४. मानवी जीव व मन हे अनुभवाचे मोठे साधन. जीवाने आपल्या इच्छेप्रमाणे चांगला किंवा वाईट अनुभव निवडावा. चांगला अनुभव घेतला, तर उच्चगती, अन्यथा अधोगती.
५. वेदांत दर्शनाप्रमाणे जग हे मिथ्या आहे सर्प-रज्जुवत् भ्रम आहे. अज्ञान व माया यामुळे ते वेगळे व अनेक भास पण वस्तुतः ते एकच तत्व आहे. ज्ञानदेवांच्या मते ते चिदविलास आहे एकच परमात्मा अनेक रूपी प्रगट होतो. मूळे अद्वैतच द्वैत रूपाने प्रगटते.
६. जग हे नाशिवंत व क्षणभंगुर आहे. पण ते नित्य नवीनही आहे. दृश्य क्षणोक्षणी पालटते, म्हणजे परमात्मा क्षणाक्षणाला नित्य नवीन स्वरूपात प्रगटतो. जसे पाण्याच्या लाटा नित्य नवीन असतात, मूळतत्व जल आहे, त्यावरील लाटा वेगळया व क्षणिक तरी पण मूलतः एकच.

वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाबरोबरच त्यांनी स्वीकारलेल्या साधनमार्गाचाही येथे संक्षेपात विचार करणे आवश्यक वाटते.

१. वारकरी संप्रदायात भक्ती हे मोक्षाचे व स्वात्मसुखाचे श्रेष्ठ साधन मानले गेले आहे.

२. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थापैकी पहिले तीन साधन आहेत व चौथा मोक्ष हा साध्य मानला गेला आहे. पण ज्ञानदेवांनी भक्तीला पाचवा पुरुषार्थ मानला आहे. भक्तीच मानवी जीवनाचे अंतिम साध्य आहे, असे म्हटले आहे.

३. भक्तिरसात ऐक्यानुभवासोबत वेगळे राहून प्रेमसुखाचा आस्वाद घेता येतो, म्हणजेच परमात्म्याच्या ठिकाणी असणाऱ्या सहज प्रेमाचा अनुभव घेता येतो.

४. अद्वैतभावाची परिसमाप्ती भक्तीत होते. अद्वैत म्हणजे एकमेव ब्रम्ह. याचा व भक्तीचा विरोध नाही. गंगा सागरात मिळते. पण गंगा म्हणून तिचे स्वतंत्र अस्तित्व आहेच.

संत एकनाथ यांनी भक्तीचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

जागृत सुषुप्ती स्वप्न। तिही अवस्था होय भजन

तेथ अखंड अनुसंधान। निज बोधे पूर्ण ठसावे अंगी ।।

मना होता समाधान। समाधाने अधिक भजन !!

पूर्ण बाणले अनुसंधान। ध्येय ध्याता ध्यान समरस भजे ॥[५]

भक्तीच सर्वश्रेष्ठ असे सांगताना संत तुकाराम म्हणतात,

मोक्ष तुमचा देवा। दुर्लभ तो तुम्ही ठेवा।।

मज भक्तीची आवडी नाही अंतरी ते गोडी ।।

काय सायुज्यता मुक्ती सवे चाड। हेचि आम्हा गोड जन्म घेती ।।[६]

संत तुकोबा यांनी या एका अभंगातून भक्तीचे सर्वश्रेष्ठत्व जसे प्रतिपादले, तसे यापेक्षा अधिक समर्थपणे सांगता येणार नाही, हे खचित.

आता वारकरी संप्रदायाच्या आचाराचीही थोडी चर्चा करणे इष्ट ठरेल. विठ्ठल ही आपल्या वारक-यांची इष्ट देवता प्रेमस्वरूप देवता, तोच पिता-माता, बंधू, भगिनी सर्वकाही. आपल्या भक्तगणांची वाट पाहत तो युगे अठ्ठावीस विटेवरी उभा आहे. वारक-यांचा महामंत्र आहे. 'राम कृष्ण हरी' राम म्हणजे अंतरी रमणारा, कृष्ण म्हणजे आकर्षित करणारा आणि हरी हा एकत्व किंवा दुर्गुणांचे हरण करणारा. हा मंत्र जपावयास जात, कुळ, वित्त, वय कशाचा प्रतिबंध नाही. कंठी तुळशीमाळ कपाळी गोपीचंदनाच्या मुद्रा आणि बुक्का खांदयावर असते व गुरूंनी माळ देताना जे काही नियम सांगितले, यांचे पालन करावे लागते.

उदा:-

१. खरे बोलावे.

२. परस्त्रीस मातेसमान मानावे.

३. अपराध घडल्यास भगवंताची प्रार्थना करून क्षमा मागावी.

४. मांसाहार वर्ज्य करावा.

५. पंढरीची वारी नित्यनेमाने करावी.

६. एकादशीचे व्रत करावे.

७. दररोज रामकृष्ण हरी या मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

८. ज्ञानेश्वरीचे नियमित वाचन करावे, हरिपाठाचे अभंग म्हणावेत.

९. प्रपंचातील नित्यकर्मे प्रामाणिकपणे करावीत आणि त्यावेळीही विठ्ठलस्मरण असावे.

वारकरी संप्रदायात दोन वाऱ्या मुख्य आहेत. पंढरीची आणि आळंदीची. पंढरपूरची सर्वात महत्वाची वारी आहे. आषाढी एकादशीची व भाळंदीच्या वारीचा दिवस आहे, कार्तिक वैध त्रयोदशी. वारक-यांसाठी या धर्मयात्रा म्हणजे जीवनाचे साफल्य. वारकरी संप्रदायाचे काही उपसंप्रदायही आहेत, जसे चैतन्य संप्रदाय, स्वरूप संप्रदाय, आनंद संप्रदाय इत्यादी. या संप्रदायान भक्त गण रामकृष्ण हरी या षडाक्षरी मंत्राद्वारे किंवा श्रीराम या त्र्यक्षरी अथवा 'राम' या द्वयाक्षरी मंत्राद्वारे आपल्या प्रिय इष्ट देवाला पांडुरंगाला आळवतात.

अशाप्रकारे वारकरी संप्रदायाचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करून असेच म्हणावे वाटते की, मानवी जीवनात ईश्वरीय दिव्य प्रेमाची अनुभूती देणारा, भक्ताचा मार्ग सुलभ करणारा व सांगणारा भागवत धर्म भक्तीचा हा एक जलौघ भक्ती रसाचा पूर म्हणजेच वारकरी संप्रदाय होय.

असा हा वारकरी संप्रदाय किंवा पंथ आज महाराष्ट्रात मोठ्या डौलाने आपला वारकरी संप्रदायाचा झेंडा फडकावीत उभा आहे.

**************************************************************************************************

**संदर्भ टिपा:**


१. प्रा. वेदालंकार वेदकुमार, म्हणे गोरा कुंभार (संक्षिप्त चरित्र व सार्थ अभंग संग्रह), विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृ.१५.

२. तत्रैव, पृ. १६.

३. तत्रैव, पृ. १६.

४. तत्रैव, पृ. १७.

५. तत्रैव, पृ. १८.

६. तत्रैव, पृ. १८.

# प्रकरण तिसरे :
# वाङ्मयातून समाजप्रबोधन

# प्रकरण तिसरे

## वाङ्मयातून समाजप्रबोधन

संत वाङ्मय म्हणजेच संत साहित्य संत. साहित्याचा अर्थ असा की निर्गुण भक्तांनी रचलेले धार्मिक लोकोपयोगी असे साहित्य हो. संताचे साहित्य हे कधीच देऊळ किंवा एखादया मठापुरते मर्यादित नसते. त्यांच्या या साहित्यातून समाजप्रबोधन होत असते. समाजाला ढवळून काढण्यासाठी अशा संत साहित्याची खूप आवश्यकता असते. मराठी वाङ्मयातील मुख्य प्रवाह हा संत साहित्यावर आधारित आहे. संत साहित्याचे बीज महाराष्ट्राच्या मातीतून उगवले आहे. मराठी संस्कृतीला संत साहित्यामुळे वेगळी ओळख निर्माण झाली आहे. तब्बल पाचशे वर्ष या साहित्यावर संतानी लिखाण केले आहे. त्यामुळे आधुनिक मराठी साहित्याचा मूळ पाया हा संत साहित्यातच आहे. त्यामुळे माणसातील माणूसपण जपण्यासाठी संत साहित्याची अधिक गरज आहे. असे साहित्य अनेक संतांनी निर्माण करण्याचे काम केले आहे. त्यात संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत गोरा कुंभार इत्यादी संत मंडळीच्या साहित्याचा समावेश होतो. या संतांनी आपल्या साहित्यातून समाज प्रबोधनाचे, समाजाची वाईट मानसिकता बदलण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.

या संत साहित्याची प्रमुख प्रेरणा ही धर्मजागृती आणि समाजप्रबोधन ही असते. या प्रकरणात श्री संत गोरा कुंभार यांच्या साहित्याचा, त्यांच्या साहित्यातून समाजाचे प्रबोधन कशाप्रकारें झाले याचा अभ्यास केला आहे. श्री संत गोरा कुंभार महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत होते. ते संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वरांचे समकालीन मानले जातात. श्री संत गोरा कुंभार यांनी अनेक अभंग लिहिले आहेत. त्यापैकी २० अभंगांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आलेला आहे. संत गोरा कुंभार हे विठ्ठलाचे (पांडुरंगाचे) खूप मोठे भक्त होते.

तेर या नगरीत संत गोरा कुंभार या घराण्याची परंपरा ही धार्मिक वृत्तीची व सदाचारी वृत्तीची होती. तेर येथील कालेश्वर या ग्रामदेवतांचे त्यांचे घराणे उपासक होते. दोघे नवरा-बायको कुंभारकाम व काबाडकष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. सदाचारी, सच्छिल वृत्तीमुळे ते गावात त्यांना सर्व गावकरी संत म्हणून ओळखत होते. संत गोरोबांच्या मनावर लहानपणापासूनच भगवंत भक्तीचे संस्कार झाले होते. गोरोबांना लिहायला, वाचायला येत होते. संत गोरोबा यांचा दिनक्रम हा सकाळी उठून अंघोळ करून, देवाची पूजा करणे, नंतर नामस्मरण करणे आणि ध्यानात पांडुरंगाचे रूप साठवून त्याला मनी मानसी मुवुन घ्यावे आणि मग न्याहारी करून कामाला लागणे असा होता दुपारचे जेवण झाल्यावर गोरोबा जराशी विश्रांती घेत असत. ही विश्रांती

म्हणजे झोप घेणे नसे, तर ते घराच्या ओसरीवरच्या खांबाला टेकून देवाचें नामस्मरण करीत बसत असत. अभंग म्हणत, विद्यांती घेत असत. त्यामुळे त्यांच्या आत्मिक एक समाधानही मिळत असे.

श्री संत गोरोबा काका हे एक थोर संत होते. त्यांचे जीवन, भक्ती व अभंग सर्वसामान्यांना शेकडो वर्षापासून प्रेरणादायी ठरले आहेत. संत गोरोबांचे अभंग हे वारकरी संप्रदायात प्रसिद्ध आहेत. त्यांचे काही अभंग हे संत नामदेव यांना उपदेश करण्यासाठी त्यांनी लिहिलेले आहेत. त्यांच्या या अभंगातून त्यांच्या पारमार्थिक विचारांनी घेतलेच्या उड्डाणामधील भव्यता आणि दिव्यता सहज दिसून येते. भक्तिमार्गातून समाज प्रबोधन करीत त्यांनी वारकरी संप्रदायाची भागवत धर्माची पताका फडकावित ठेवली. या प्रकरणात त्यांच्या काही अभंगांची ओळख करून देण्यात आलेली आहे की, ज्यातून त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले.

**अभंग - १**

केशवाचे ध्यान धरुनि अंतरी । मृत्तिके माझारी नाचतसे ।। १ ।।

विठ्ठलाचे नाम स्मरे वेळोवेळ। नेत्री वाहे जळ सद्गदीत ॥ २ ॥

कुलालाचे वंश जन्मलें शरीर तो गोरा कुंभार हरिभक्त ।। ३ ।।[१]

केशवाचे ध्यान हृदयी धरून (तो कुंभार) चिखल तुडवीत असताना सदासर्वदा विठ्ठलाचे नाव घेत नाचत असतो. गाढ भक्तीमुळे त्याच्या डोळयातून निर्झर प्रेमाश्रू वाहत असतात व त्यांचा कंठ तेव्हा दाटलेला असतो. कुंभाराच्या कुळात जन्मलेला तो हरिभक्त गोरा कुंभार आहे. या अभंगात कवीने स्वतः चा वंश व व्यवसाय यांची ओळख सांगितली आहे. तेर (ता. जि. धाराशिव उस्मानाबाद) या क्षेत्री गोरा कुंभार यांचे वास्तव्य असे. ते महान भगवद्भक्त होते. तेर येथेच त्यांची समाधी आहे. चरितार्थासाठी व्यवसाय करताना, माती तुडवीत असताना ते मुखाने हरिनाम घेत एवढे तल्लीन होऊन नाचत की त्यांना देहभान उरत नसे. अशाच एका प्रसंगी त्यांचे स्वतः चे तान्हें मूल त्यांच्याच पायाखाली आले व तुडविले गेले, हे सुद्धा त्यांच्या लक्षात आले नाही. ही कथा त्यांच्या चरित्रात विस्ताराने दिली आहे.

**अभंग - २**

वरती करा कर दोन्ही । पताकाचे अनुसंधानी ।। १ ।।

सर्व हस्त करिती वरी। गोरा लाजला अंतरी ।। २ ।।

नामा म्हणे गोरोबासी। वरती करावे हस्तांसी ।। ३ ।।

गोरा थोटा वरती करी। हस्त फुटले वरचे वरी ।। ४ ।।[२]

संत शिरोमणी श्री नामदेव यांचे कीर्तन पंढपुरात सुरू असताना त्यांनी सर्व श्रोते भाविक मंडळींना सांगितले की सर्वांनी हात वर करावेत व हरिनामाची पताका त्या हातांनी उंच धरावी. सर्वांनी हात वर केले, पण गोरा कुंभारास लाज वाटू लागली की आपले थोटे हात वर कसे करावे व पताका कशी धरावी. ही गोरोबांची अडचण नामदेवांनी ओळखली व म्हणाले गोरोबा आपणही हात वर करावेत. गोरा कुंभाराने हात वर केले, आणि काय आश्चर्य! त्यांना पुन्हा हात फुटले. थोटे हात जाऊन मनगट व बोटे यासह त्यांचे हात पूर्ववत झाले.

या अभंगात गोरोबांनी स्वानुभवाचे कथन केले आहे. श्री विठ्ठलाची आण याच हातांनी मोडल्याबद्दल पश्चात्तापदग्ध गोरोबांनी आपले दोन्ही हात शस्त्राच्या तीक्ष्ण धारेवर आपटून मनगटापासून तोडून टाकले होते. पण भगवत्कृपेमुळे त्यांचे थोटे हात कीर्तनप्रसंगी पुन्हा पूर्ववत झाले, हा स्वानुभव गोरोबांनी येथे सांगितला आहे. यात भगवंताच्या कृपेचा महिमा व्यक्त होत आहे. वाचकांनी ही आख्यायिका चरित्रात सविस्तर वाचावी.

**अभंग – ३**

निर्गुणाचा संग धरिला जो आवडी । तेणे केले देशधडी आपणासी ।। १ ।।

अनेकत्व नेलें अनेकत्व नेलें । एकलें सांडिलें निरंजनं ।। २ ।।

एकत्व पाहतां अवघेचि लटिकें। जें पाहें तितुकें रूप तुझें ।। ३ ।।

म्हणे गोरा कुंभार ऐका नामदेवा तुम्हा आम्हा नाव कैचे कोण ।। ४ ।।[३]

संत गोरा कुंभार यांच्या अभंगांपैकी बरेच अभंग संत नामदेवांना उद्देशून सांगितलेले आहेत. गोरोबा म्हणतात की मी त्या निर्गुणाचा, निराकार, निरंजन परमेश्वराचा संग मोठ्या आवडीने धरला. त्यामुळे त्याचा शोध घेण्यासाठी देशोदेशी भटकावे लागले. दुसरा अर्थ वेगळा आहे तो असा देशोधडी लागणे म्हणजे दरिद्री होणे, निर्गुणाची आवड व संग असा विचित्र की त्यामुळे निर्धन व्हावे लागते. आम्ही द्वैताचा (अनेकत्वाचा त्याग करून त्या एका निर्गुणात परमेश्वरात भेदाभेद समाहित केले. जेव्हा सर्वांठायी, सर्वांभूती एकत्व पाहिले, भक्त व परमेश्वर दोन्ही एकच, असा भाव अनुभवला, सर्वत्र त्या देवाचेच रूप पाहिले, तेव्हा जाणवले की दृश्यमान जग सारे खोटेच आहे. जिकडे तिकडे जे जे पाहावे, तिकडेतिकडे ते ते तुझेच रूप आम्हास दिसू लागले. गोरा कुंभार म्हणतो, अहो

नामदेवा, ऐका, आता तुमचे आमचे नाव तरी कोणते? एकत्व अनभवल्यावर मी गोरा कुंभार, तुम्ही नामदेव, ही नावे राहिलीच कुठे? सर्वठायी तेच ब्रह्म. त्याचीच रूपे. तुम्ही आम्ही मग वेगळे कसे? आपपरभेद नष्ट होऊन एकत्वाची प्रचीती तुम्हा आम्हा होत आहे.

ईश्वराच्या सगुण-निर्गुण या दोन लक्षणांवरून सगुणभक्ती व निर्गुणभक्ती असे दोन प्रकार झाले. संत गोरोबांना परमेश्वराची ही दोनही रूपे सारखीच वंदनीय, उपासनीय वाटतात. पण अनेकत्वाकडून एकत्वाकडे नेणाऱ्या निर्गुणत्वाकडे ते अधिक ओढले जातात. प्रस्तुत अभंगात एकत्वाची प्रचीती म्हणजे जीव-ब्रह्म ऐक्य. माया आणि अज्ञान यांचे निरसन झाल्यास जीवास 'अहं ब्रह्मास्मि' मी ब्रह्मच आहे असा अद्वैताचा अनुभव येतो. त्याची परिणती मग 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या उपरतीत होते. सर्वांठायी सर्वाभूती तो एक परमेश्वरच असल्यावर, माणसांमाणसांत त्याचेच अस्तित्व अनुभवल्यावर जात, धर्म, द्वेष मत्सर, उच्च-नीच हे सर्व अमंगळ भेद आपोआपच लोप पावतात.

**अभंग - ४**

अंतरीचे गुज बोलूं ऐसें काही। वर्ण व्यक्त नाहीं शब्द शून्य ।। १ ।।

जय जय झनकूट जय जय झनकूट अनुहात जंगट नाद गजें ।। २ ।।

परतल्या श्रुती म्हणती नेती। त्याही नादा अंती स्थिर राहे || ३ ||

म्हणे गोरा कुंभार सत्रावीचें नीर सेवी निरंतर नामदेवा ।। ४ ।।[४]

संत गोरा कुंभार नामदेवास उपदेश करीत म्हणतात की आपण अंतरीचे असे काही गुण, गूढ, गर्म, बोलू जे वर्ण अक्षरे वा शब्दांद्वारे व्यक्त केले जाऊ शकत नाही. ते अनुभवावेच लागते. ते गूढ, गूपित जणू अनाहत जयजयकार नाद आहे. (कर्णेंद्रियाद्वारे ऐकू येणारा नाद वेगळा व हा अनाहत नाद वेगळा) आघातजन्य नाद हा जनसामान्यांना ऐकू येणारा, कानांद्वारे ग्रहण होऊ शकणारा नाद. पण हा अनाहत नाद योगिजनांच्या हृदयाकाशात आघाताविना झंकारणारा असतो. आम्ही तो निरंतर ऐकत आहोत. मागील जुने वेदादी ग्रंथ त्या परब्रह्माला 'नेति नेति' (न+इति, न+इति) म्हणत आहेत. या तिसऱ्या ओळीचा पर्यायी अर्थ असाही होऊ शकतो. श्रुती परतल्या म्हणजे वेदादी ग्रंथ परत फिरले, कधी न इति, न इति म्हणत, म्हणजे येथे शेवट नाही, येथे शेवट

नाही, बाला अंत नाही, याला अंत नाही, येथे हे संपलेले -थांबलेले नाही, आणखीही पुढे आहे, आणखीही पुढे आहे. तेथे पोहोचणे आपणास शक्य नाही, म्हणून फिरा माघारी, त्या नादाचा अंत लागत नाही म्हणून आता थांबणे उचित, म्हणून स्थिर होतात. अर्थात वेदांचे ज्ञानही समाधिस्थितीत अनुभवास येणाऱ्या अनाहत नादाच्या अवस्थेत स्थिरावते. गोरा कुंभार म्हणतो की हे नामदेवा, या समाधिदशेत योगिजनांप्रमाणे तुम्हीही सत्राव्या कलेचे पाणी निरंतर प्राशन करीत राहा. जीवांच्या कला सोळा, परमेश्वर ही सत्रावी कला, सायुज्यता ही सत्रावी अवस्था.

या अभंगात हठयोगासंबंधीच्या काही स्थितीचे व अनुभवांचे गूढ संत तसेच योगी गोरोबांनी स्पष्ट केले आहे. अनाहत नाद व सत्रावीचे नीर हे सर्व योगी हृदयाच्या अनुभवाचे विषय आहेत. या समाधिदशेत ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय असा भेद राहात नाही. सातत्याने अनुभवांची स्थिती असते. संसारीजन या स्थितीला पारखे असतात, पण योगीजनांना ते साध्य आहे. या वर्णनावरून संत गोरा कुंभार हे योगीही होते, हे स्पष्ट आहे, एवढेच नव्हे तर संत नामदेवासारख्या योगीजनांस ते उपदेश करताहेत, तेव्हा त्यांच्या योगातील अधिकार वादातीत आहे.

**अभंग - ५**

एकमेकांमाजी भाव एकविध असे एक बोध भेदरहित ।। १ ।।

तू मज ओळखी तूं मज ओळखी। मी तुज देखत आत्मवस्तु ।। २ ।।

आत्म वस्तु देही बोलता लाज वाटे। अखंडता विपडे स्वरूपाची ॥ ३॥

म्हणे गोरा कुंभार अनुभवाचा ठेवा। प्रत्यक्ष नामदेवा भेटलासी ।। ४ ।।[५]

परस्परांच्या अंतःकरणात एकमेकाविषयी एकच भाव असावा. भिन्नतेची जाणीव, वेगळेपणा नष्ट होऊन भेदरहित असा अभिन्नतेचा भाव एकमेकाविषयी असावा. तू म्हणजे मी, मी म्हणजे तू असे अभिन्नत्व असावे. तू आणि मी त्वं आणि अहं हा भेद दूर होऊन तू मला ओळखावे, ते अशाप्रकारे तू-तू नव्हे, तू-मी आहेस, आणि मी देखील तुझ्यामध्ये स्वतः ला पाहावे, स्वतः प्रमाणेच तुला जाणावे, अनुभवावे. आत्म म्हणजे मी व माझे, हे माझे शरीर, हा तुझा देह असे म्हणताना देखील संकोच वाटावा. अपर, आपला परका हे द्वैत लय पावावे, कारण त्यामुळे आत्मरूपाचे अखंडत्व भंगते. एकत्व नाश पावून अनेकत्वाचा भाव उत्पन्न होतो. गोरा कुंभार म्हणाले की माझा हा अनुभवाने मिळविलेला ठेवा देत आहे. नामदेवा! बरे झाले. तुझ्यासारख्या श्रेष्ठ भक्तानेच ऐकावा म्हणून तुला सांगितला. कारण त्या अनुभवाचा ठेवा तुझ्याकडेही आहेच.

'आत्मवत् सर्वभूतेषु यः पश्यति स पश्यति' या संस्कृत सुभाषिताप्रमाणे जो आपल्याप्रमाणे सर्वांकडे पाहतो, किंबहुना सर्वांठायी आपणासच पाहतो, सर्वांच्या सुखदुःखाशी समरस होतो, 'मी' पणाचा त्याग करून 'सर्वांचा मी, माझे सर्व' असे जो पाहतो, तोच खरा ज्ञानी. भिन्नत्वाची जाणीव व भेदभाव हेच सर्व अरिष्टांचे व पापांचे मूळ आहे. एकत्वाच्या भावनेमुळे उच्च-नीच भाव व सर्व अमंगळादि भाव नाश पावतात, असे गोरोबांना सांगावयाचे आहे. त्यांचे हे तत्त्वज्ञान कालातीत आहे. भूत, वर्तमान व भविष्य या तिन्ही काळांसाठी कल्याणकारी आहे. जात, धर्म, देश, पंथ, धनाढ्य निर्धन या भेदांत सर्व दोषहारी व गुणकारी असेच आहे. आजही सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी हा सार्वकालिक उपाय उपयुक्त आहे व उद्याही तो तसाच असणार आहे.

**अभंग - ६**

सरितेचा ओघ सागरी आटला विदेही भेटला मनामन ।। १।।

कवणांचे सांगातें पुसावया कवणातें सांगतों ऐक ते तेथें कैचें ।। २ ।।

नाही दिवस राती नाही कुळ याती नाही माया भ्रांती अवधेची ।। ३ ।।

म्हणे गोरा कुंभार परियेसी नामदेवा सापडला ठेवा विश्रांतीचा ।। ४ ।।[६]

नदी वाहत वाहत सागरात मिळते, तेथे तिचा प्रवाह संपतो, तिचे पाणी सागराच्या पाण्याशी इतके एकरूप होऊन जाते की ते वेगळे करणे वा वेगळे दिसणे शक्य नसते. तद्वत् विदेही म्हणजे शारीरिक वा ऐहिक विषयांची आसक्ती संपविणारा, देहभान हरवलेला माणूस इतरांना भेटतो, मनाशी मनाचे मीलन होते. तो विदेही, सर्वांविषयी आत्मभाव ठेवून सर्वांशी एकरूप होतो. या दशेत कोणी कोणाला काय सांगावे? कसे सांगावे? कोणी कोणाला प्रश्न तरी विचारावेत कसे? कारण, एकत्व वा अभिन्नत्व असताना तू मी हे वेगळेपण उरत नाही. सर्व एकच. मग ते सांगणारा व ऐकणारा हे द्वित्व नाही, दुजाभाव नाही, मग कोण सांगणार व कोण ऐकणार? त्या दशेत दिवस नाही, रात्र नाही, कूळ नाही, जात नाही. दिवस रात्र, जात-पात असा भेद उरत नाही. माया-मोह लोप पावतात. भ्रांती आणि संशय यांचा लेशही अत नाही. गोरा कुंभार सांगतो नामदेवा, लक्ष देऊन ऐक. अशाप्रकारे विश्रांतीचा, योगसाधनेतून निर्माण झालेल्या मानसिक शांतीचा अमोल ठेवा आम्हा गवसला आहे. तूही त्याचा अनुभव घेत आहेसच.

शुद्ध, निर्मळ, नित्य, अशा शांतीचा अनुभव ज्याने घेतला, जो देही असूनही विदेही झाला, त्या विरक्तास राजा जनकाप्रमाणे ऐहिक आसक्ती व्यथित किंवा त्रस्त करू शकत नाही. ज्याप्रमाणे सागरात विलीन होऊन नदी

आपले अस्तित्व हरवते, तद्वत 'स्व' ला 'पर' मध्ये विलीन करतो, तोच परम साधू, तोच संत सागरात विलीन झालेल्या नदीचे जसे वेगळेपण उरत नाही, तसे 'मी' 'अहं' या व्यक्तिमत्त्वाच्या संकुचित सीमा ओलांडून त्या विराट ब्रह्मसागरात व्यक्तीने विलीन व्हावे, यातच जीवनाचे सार्थक आहे.

**अभंग - ७**

निर्गुणाचे भेटी आलों सगुणासंगे। तंव झालों प्रसंगी गुणातीत ।। १ ।।

मज रूप नाही, नांव सांगूं काई। झाला बाई काई बोलूं नये ।। २ ।।

बोलतां आपली जिव्हा पैं खादली। खेचरी लागली पाहतां पाहतां ।। ३ ।।

म्हणे गोरा कुंभार नाम्या तुझी भेटी। सुखासुखी मिठी पडली कैसी ।। ४ ।।७

विरोधाभासाचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून या अभंगाकडे पाहता येईल. प्रकाशाचा शोध घ्यावया अंधाराने जावे व तेव्हा स्वतः सच हरवून बसावे हा प्रसंग विक्षिप्तच, पण खरा. तद्वतच सगुणास सांगाती घेऊन निर्गुणाच्या भेटी मी निघालो. मी अज्ञानवश, ज्ञानांधकारवश स्वतःस देह (सगुण) मानून त्या निर्गुणास, परमेश्वरास शोधू लागलो. त्यास जाणून घेण्याचा प्रयत्न करू लागलो, तो तेथे मी स्वतःच निर्गुण होऊन त्याच्याशी एकरूप झालो. एकत्व झालो. एकत्व पावलो. असा एकरूप झालो की वेगळेपण उरलेच नाही, रूप उरले नाही, नाव उरले नाही, मग नाव तरी काय सांगू? वेगळे अस्तित्वच नसणाऱ्याबद्दल बोलणे हे निरर्थक (काईबाई) तरी, असे बोलू लागलो, तेव्हा जीभ खणली गेली, खोल गेली आणि पाहता पाहता खेचरी लागली. योगीजन साधना करीत असता खेचरी मुद्रेत ज्या विशिष्ट तन्मयतेच्या दशेत पोहचतात, खेचरी मुद्रेतील ती दशा आम्हास बघता बघता प्राप्त झाली. गोरा कुंभार म्हणतो हे नामदेवा, तुझी भेट झाल्यानंतर अशी ही आत्म्यापरमात्म्याची मिठी पडली. आत्म्यापरमात्म्याचीही भेट इतक्या सुखासुखी, इतक्या सहजतेने व तन्मयतेने झाली की तो केवळ तुझ्यासारख्या योगी साधकांच्या सहवासाचा परिणाम म्हणून कोण हा आनंद!

**अभंग - ८**

कैसें बोलणे कैसें चालणें । परब्रह्मीं राहणें अरे नामा ।।१।।

जेवी त्याची खूण वाढितांचि जाणे । येरा लाजिरवाणें अरे नामा ।। २ ।।

म्हणे गोरा कुंभार अनुभवीत जाणे आम्हातें राशी राहाणें असे नामा ||३ ॥८

ब्रह्मानंदी टाळी लागल्यावर, अरे नामदेवा, कसले बोलणे! कुठले चालणे! देहाच्या+ इंद्रियांच्या सर्व क्रिया शांत होतात. केवळ ब्रह्मानंदात भक्ताने तल्लीन व्हावे, ब्रह्मरूप होऊन रहावे, त्या आनंदाची खूण, मर्म असे जाणावे की तो आनंद सातत्याने वाढत जातो. केवळ योगीच त्या वाढत्या आनंदाचा अनुभव घेऊ शकतो. त्याच्या उलट म्हणजे तो वाढण्याऐवजी अवनत, घटत वा कमी होत असेल तर ते अतिशय लाजिरवाणे होय. गोरा कुंभार म्हणतो की भक्ताने त्या परमोच्च स्थितीत राहणे हेच आमच्यासारख्या लोकांना आवडते, किंवा या आनंदात तल्लीन होऊन, म्हणजे मूळ घटकासह राहणे, हेच आम्हास स्वीकार्य आहे.

परब्रह्माच्या आनंदक्षेत्री गेल्यावर तेथून परत येणे कुठले! खाणे-पिणे, बोलणे- चालणे, आदी सर्व ऐहिक क्रिया विसरून त्याच आनंदडोही मग्न राहावे. एवढेच नव्हे तर तो आनंद वाढत जावा व सतत अनुभवीत राहावा. अशा यौगिक स्थितीतून परत येणे अती लाजिरवाणे असते. राशी किंवा सर्वांचे मूळ जे ब्रह्म, त्याच्या आनंदात निमग्न असण्याच्या उच्च स्थितीत राहणे हेच गोरोबास मान्य आहे व संत नामदेवानेही याच उच्च स्थितीत पोचावे, अशा तळमळीमुळे गोरोबा नामदेवास तसा उपदेश करतात.

गोरोबांनी आनंदाचे मर्म सांगताना म्हटले आहे की, जो आनंद सतत वाढत जातो तोच खरा आनंद, कबीरदासाने देखील म्हटले आहे 'हरिरस पीया जाणियै, जे कबहु न जाय खुमार,' भक्तिरसाची गोडी सतत निरंतर वाढत जावी. त्याची नशा कधीही उतरत नसते. भक्तीच्या रसाचे वेगळेपण हेच आहे. इंद्रियांचा आनंद सांसारिक सुखांपासून मिळणारा आनंद तात्पुरता व क्षणभंगुर असतो. मद्याचा मद उतरतो, पण भक्तिरसाचा मद उतरत नाही, वाढतच जातो, हेच त्याचे वैशिष्ट्य हेच त्याचे अलौकिकत्व.

**अभंग - ९**

मुकिया साखर चाखाया दिधली। बोलतां हे बोली बोलवेना ।। १ ।।

तो काय शब्द खुंटला अनुवाद। आपुला आनंद आधाराया ।। २ ।।

आनंदी आनंद मिळूनी राहणें। अखंडित होणें न होतिया || ३ ||

म्हणे गोरा कुंभार जीवन्मुक्त होणें । जग हे करणें शहाणें बापा ।। ४ ।।[९]

मुक्या माणसास खाण्यासाठी साखर दिली, तर तिची गोडी त्याला वाणीद्वारे सांगता येईल काय? तो मुका माणूस साखरेची गोडी अनुभवतो, पण त्या गोडीचे वर्णन तो शब्दांनी करू शकत नाही. त्या ब्रह्मानंदातील दशेत वाणी, शब्द, भाषा, आशय सर्वांचीच शक्ती उणी पडते, सर्व काही थांबते. भक्ताने केवळ हृदयातील आनंद

अनुभवावा. त्या आनंदाच्या डोही डुंबलेले असावे. आनंद आणि केवळ आनंद घेत जावे. त्या आनंदसागरात बुडून जावे. ती आनंदमय स्थिती खंडित होऊ देऊ नये. गोरा कुंभार म्हणतो की हे प्रिय नामदेवा, भक्ताने जीवन्मुक्त व्हावे, जिवंतपणी आत्मज्ञानाद्वारे मुक्त व्हावे, तसेच प्राप्त ज्ञानाने जगासही शहाणे करून सोडावे.

हिंदी संत कवी सूरदास यांनी निर्गुणाच्या अनिर्वचनीयतेचे वर्णन करताना गोरोबांप्रमाणेच म्हटले आहे. 'अविगत गति कछु कहत न आवै। ज्यों गूँगे मीठे फल को रस अंतरगतही भावै ॥ मुक्यास गोड फळे दिल्यास तो खाईल, पण त्याची गोडी किती व कशी, हे तो वाणीने सांगू शकेल काय? नाही. कारण ती केवळ ज्याची त्याने अनुभवावी लागते. आनंदात मग्न झाल्यानंतर भक्ताने मुक्याप्रमाणे तो फक्त अनुभवीत राहावे. त्याचबरोबर आनंदाच्या त्या ज्ञानाने समृद्ध होऊन केवळ स्वतःचेच हित न पाहता सर्व जगाला त्या ज्ञानाद्वारे शहाणे करून सोडावे. तो ब्रह्मानंद जरी ज्याचा त्याने स्वतःच अनुभवावयाचा असतो, तरी पण त्या स्थितीप्रत जाण्याचा मार्ग सर्वांना सांगावा. त्या आनंदसागरात स्नान करण्याचा लाभ कसा घ्यावा याचा उपाय, मार्ग अवश्य सांगावा, असेही गोरोबांना सुचवावयाचे आहे.

**अभंग - १०**

कवण स्तुति करूं कवणिया वाचे ओघ संकल्पाचे गिळिलें चित्तें ।। १ ।।

मन हैं झालें मुकें, मन हैं झालें मुकें। अनुभवाचे हैं सुखें हेलावलें ।। २ ।।

दृष्टीचे पहाणे परतले मागुती राहिली निवांत नेत्रपाती ।। ३ ।।

म्हणे गोरा कुंभार मौन्य सुख घ्यावे। जीवें ओवाळावे नामवासी ।। ४ ।।[१०]

मी त्या योगसाधनेतून लागलेल्या समाधीस्थितीची स्तुती कशी करू? ते शक्य नाही, कारण ती अवर्णनीयच आहे, अनिर्वचनीय आहे. माझ्यापाशी अशी समर्थ वाणी तरी कोठे आहे जिच्याद्वारे त्याचे वर्णन करू? अर्थातच ते ब्रह्म, तो आनंद वाणीच्या सामर्थ्यापलीकडचा आहे. संकल्प-विकल्प, निश्चय भ्रम आदी भाव त्या आनंददशेत चित्तातच लोप पावतात. मन मूक होऊन जाते, मनाची क्षमता वर्णन करण्यास वाणी अपुरी पडते आणि चंचल मन याच देही आत्मानंद सुखाचा अनुभव घेत, आनंदाचे झोके घेत हरवून जाते. पाहणे, हे दृष्टीचे कार्यही थांबते. योगीजनांची दृष्टी वस्तूंवरून परत फिरून मनातच स्थिरावते. डोळयांची पाती निश्चल होतात. गोरा कुंभार म्हणतो की भक्ताने मौन राहून मौन अवस्थेत अतीन्द्रिय अलौकिक सुख अनुभवावे. आपले पंचप्राण नामदेवावरून ओवाळून टाकावेत, एवढे मौल्यवान सुख त्याने अनुभवले आहे, एवढा त्याचा महिमा आहे. परब्रह्म

दृष्टीचा विषय होऊ शकत नाही, वाणी त्याचे वर्णन करू शकत नाही. अतीन्द्रिय असा तो अनुभव असतो. तो इंद्रियांच्या कक्षेत येत नाही, चंचल मनही त्या अवस्थेत चंचलपणा गमावून एकाग्र होते, स्थिर व शांत होते, मौन होऊन ते सुख अनुभवावे, येवढी उत्कट भावावस्था केवळ योगीजनांनाच शक्य असते.

**अभंग - ११**

काया वाचा मन एकविध करी। एक देह धरी नित्य सुख ।। १ ।।

अनेकत्व सांडीं अनेकत्व सांडी आहे ते ब्रह्मांडी रूप तुझें ।। २ ।।

निर्वासना बुद्धी असतां एकपणें । सहज भोगणें ऐक्य राज्य ।। ३ ।।

म्हणे गोरा कुंभार नाहीं रुपरेख। तोंचि तुझें सुख नामदेवा ।। ४ ।।११

शरीर, वाणी, मन एकाग्र करून या एका देहातच नित्य सुख अनुभवावे. अनेकत्वाच्या संकल्पनेचा त्याग करावा, कारण तो भ्रम आहे. खरे पाहता एक ब्रह्मच सत्य आहे. तेच तुझे रूप, नामदेवा, तुझे ते ब्रह्म रूपच सर्व ब्रह्मांड व्यापून राहले आहे. तू म्हणजे ब्रह्मच, हे सत्य आहे. वासनांचा त्याग करून निर्मोह, निष्काम झाल्याने त्या एकत्वाची, जीव-ब्रह्म ऐक्याची प्रचीती येते आणि मग तू ते ऐक्याने परिपूर्ण अशा स्वतंत्र राज्याचा उपभोग घेऊ शकतोस. गोरा कुंभार म्हणतो, हे नामदेवा, हे जे तुझे दृश्यमान शरीर आहे, ते तू नव्हेस, हे जाणून घे, तुझे यथार्थ रूप ब्रह्म आहे. ते रूप, रंग, आकाररहित आहे. तेच तुझे खरे रूप, तोच तुझा खरा आनंद, हे जाणून घे. गोरोबाकाकांनी येथे अद्वैतवादाचा परामर्श घेऊन 'तत्त्वमसि' या वाक्याप्रमाणे नामदेवांना तसेच त्यांच्या माध्यमातून सर्वांना जाणीव करून दिली आहे की 'ओळखा, तुम्ही कोण आहात ते!' संत नामदेवास ते म्हणतात, की तू म्हणजे हा देह नव्हे, कारण तो असि=आहेस, नाशिवंत आहे. मग तू कोण आहेस? वेद-उपनिषद् शास्त्रांत हाच प्रश्न 'कोऽसि म्हणून विचारला आहे. त्याचे उत्तर अद्वैतवादामध्ये तत् म्हणजे ते (ब्रह्म) त्वम्= तूच, असे दिले आहे. संत गोरोबा म्हणतात, आहे ते ब्रह्मांड रूप तुझे! ब्रह्मानंद हाच खरा आनंद, इंद्रियजन्य आनंद क्षणभंगुर, मिथ्या. ब्रह्मानंदाचा कधीच वीट येत नाही. नित्य निरंजन रूपास सोडून इंद्रिय सुख यासच सुख मानणे, हे केवढे अज्ञान! हाच उपदेश येथे आहे.

**अभंग - १२**

स्थूल होते तें सूक्ष्म पैं झाले। मन हैं बुडाले महासुखीं ।। १ ।।

माझें रूप माझें विरालेसें डोळां । माझें ज्ञान सामाविलें माझें बुबुळां ।। २ ।।

म्हणे गोरा कुंभार नवल झाले नाम्या भेटी तुम्हां आम्हां उरली नाहीं ॥ ३॥[१२]

जे स्थूल होते ते सूक्ष्म झाले. हे शरीर स्थूल साकार होते, ते ब्रह्मानुभूती झाल्यावर सूक्ष्म (आत्म) रूप झाले. मन त्या आत्मानंदाच्या डोही बुडाले, याचा अनुभव आम्हांस येत आहे. माझे दृश्यमान रूप माझ्याच डोळ्यात विरून गेले. दृष्टी बाह्यरूप न पाहता अंतर्मुख झाली आहे आणि माझे ज्ञान माझ्या बुबुळांच्या आत सामावून राहिले आहे, अर्थात् जे बाह्य साकार जग, स्थूल शरीर पाहत होते, ते ज्ञान अंतर्मुख होऊन बुद्धीमध्ये स्थिरावले आहे. गोरा कुंभार म्हणतो, अरे नामदेवा। हे नवलचि घडले । आपले केवढे सद्भाग्य की आता तुझ्या भेटीची आवश्यकता उरली नाही. तू ब्रह्म व मीही ब्रह्मच. दोघे एक, मग भेट कोणी कोणाची घ्यावयाची? तू व मी एकच होऊन एकत्व पावलो आहोत.. किती हे सद्भाग्य ।

ते ब्रह्म अणोरणीयान् अणूहून सूक्ष्म व महतो महीयान् स्थूलाहून स्थूल आहे. स्थूल व दृश्य जगत आहे ते वस्तुतः ब्रह्मच आहे. ब्रह्मत्वाची अनुभूती झाल्यावर सर्व वस्तू, प्राणी, मनुष्यादी सर्वांमध्ये सूक्ष्मरूपाने वर्तमान ब्रह्माचे दर्शन भक्तास घडते. बाह्यरूप पाहणारी इंद्रिये अंतर्मुख होऊन आतील सूक्ष्म तत्त्वास पाहू लागतात, आणि मग अंतर्बाह्य असा भेद अत नाही. जे पिंडी तेच ब्रह्मांडी, याचा अनुभव योगीजनांस व भक्तांस येतो. शरीराने शरीराला भेटावे, ही मिठी बाह्य व तात्पुरती असते, पण जीव+ ब्रह्म यांची पडलेली मिठी सुटत नाही. त्या आनंदाची कधीच समाप्ती नाही..

**अभंग - १३**

केशवाचे भेटी लागलें पिसें । विसरले कैसें देहभान ।। १ ।।

झाली झडपणी झाली झडपणी। संचरले मनी आधीं रूप ॥ २॥

न लिपेची कर्मी न लिंपेची धर्मी। न लिंपे गुणधर्मी पुण्यपापा ।। ३ ।।

म्हणे गोरा कुंभार सहज जीवन्मुक्त सुखरूप अद्वैत नामदेव ।। ४ ।।[१३]

केशवाच्या (पांडुरंगाच्या भेटीसाठी माझा जीव वेडापिसा झाला आहे. त्याच्या भेटीची मला इतकी ओढ लागली आहे की मी देहभान हरवून गेलो आहे. माझ्या मनाने त्या केशवाचा असा काही ध्यास घेतला आहे की जणू माझ्यावर त्याने जादूटोणा केला आहे. त्याच्या ध्यासामुळे माझ्या मनाची झडपणी होऊन ऐहिक, सांसारिक बाधा नष्ट होऊन मनात आता केवळ त्याचे रूपच संचारले आहे. तेच ब्रह्मरूप आधी आणि अंती सर्वकाळ मनात भरून राहिले आहे. मी, म्हणजे ब्रह्म, आता कोणत्या कार्यात लिप्त होत नाही, कोणता धर्म, स्वभाव किंवा

कर्तव्यकर्म मला बंधनात ठेवू शकत नाही. गुण-अवगुण, धर्म-अधर्म, पाप-पुण्य या सर्वांपासून मी दूर झालो आहे, अलिप्त आहे. अशा योगजन्य अवस्थेत मी आहे. गोरा कुंभार म्हणतो नामदेवा! मी आता सहजपणे जीवन्मुक्त झालो आहे. जिवंतपणी आत्मज्ञानाद्वारे मुक्त झालो आहे. हा सुखरूपी अद्वैतभाव अनुभवीत आहे.

भक्ती ही सुखासुखी साध्य होणारी, प्राप्त होणारी संपत्ती नाही. यासाठी देहभान विसरावे लागते. तहान-भूक, निद्रा, सुखासीनता सर्व विसरून संत मीराबाईप्रमाणे वेड लावून घ्यावे लागते. मग द्वेष, मत्सर चिंतादी मानसिक दोष आपोआप गळून पडतात. माणूस कर्मयोगी बनतो, स्थितप्रज्ञ स्थितीस प्राप्त होतो. सुखदुःख समान मानून निष्काम कर्मे करीत तो कधीही कामना वासनांना वशीभूत होत नाही. जिवंत असूनही जीवनापासून वेगळा असतो. कमळपत्राप्रमाणे पाण्यात असूनही पाण्यावर वेगळा असा निष्काम योगी बनतो. या स्थितीतच अपरंपार सुखाच्या निधीचा तो भोक्ता होतो. संत गोरोबांनी या अभंगामध्ये योग समाधीतील स्वतःअनुभवलेल्या आनंदाचे वर्णन किती प्रभावीपणे केले आहे, हे पाहण्यासारखे आहे. अशाच देहभान हरवलेल्या एका अवस्थेत त्यांचे मूल पायाखाली चिखलात तुडविले गेल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. भक्तीत एवढी तल्लीनता हवी.

**अभंग - १४**

वंदावे कवणासी, निंदावें कवणासी । लिंपावें गगनासी कवण लिपी ।। १ ।।

नाहीं जया रूप, नाहीं जया ठाव । तेंचि व्यालें सर्व सांगतसे || २ ||

जीवनीं चंद्रबिंब बिंबले पैं साचें। परि नाही तें नितंबिले जवळें जेवीं ॥ ३ ॥

म्हणे गोरा कुंभार नामया जिवलगा आलिंगन देगा मायबापा ।। ४ ।।[१४]

कोणाची स्तुती करावी, कोणाची निंदा करावी, ही व्यर्थ उठाठेव आम्ही का करावी? निंदा-स्तुती, मान-अपमान यांना आम्ही दूर टाकून आलो आहोत. समाधी अवस्थेत किंवा स्थितप्रज्ञदशेत निंदा-वंदना अशा सर्व दोषांचा संसर्ग आम्हाला लागत नाही. आकाशाला लिंपणे, लेप लावणे कोणास तरी शक्य आहे काय ? तद्वत् निंदा-स्तुती, गुण- अवगुण असे विकार आम्हा स्थितप्रज्ञ भक्तांना बाधा करू शकत नाहीत. ज्यास रूप नाही, आकार नाही, ज्याचा निश्चित ठावठिकाणा नाही, जो सर्वव्यापी आहे, ज्यापासून हे सर्व दृश्यमान विश्व उत्पन्न झाले आहे, तोच सर्वांचा सांगाती आहे. तोच सर्वांत असून सर्व त्यातच आहेत. ज्याप्रमाणे चंद्रबिंब पाण्यात प्रतिबिंबित होते, तेव्हा मूळ बिंबच खरे असते, पण आकाशात ढग भरून येताच ते चंद्रबिंब झाकाळले जाते, म्हणून काय मूळ चंद्रबिंबाचे अस्तित्व संपलेले असते? तद्वत् अंतरी ब्रह्म आहे, तेच खरे व नित्य असते. गुण अवगुणाच्या आवरणामुळे

जरी ते झाकळले जाते, तरी ते निराकार ब्रह्म सर्व ठायी व्यापलेले असते. गोरा कुमार म्हणतो, हे माझ्या मायबापा, माझ्या जिवलगा, संख्या, लाडक्या नामदेवा, तूही आपल्या अंतरी वसणाऱ्या जिवलग परब्रह्मास आलिंगन दे. त्या अंतर्यामी देवास मिठी मारून त्यास सखा करून घे. त्यास कधीही अंतर देऊ नकोस.

पाहिल्यास, अनुभवल्यास निंदा-स्तुती, मान-अपमान अशा दोषांपासून माणूस दूर राहतो. सर्व विश्व त्या परब्रह्मापासून उत्पन्न झाले असून त्या परब्रह्मास सर्वांभूती सूक्ष्मरूपे मेघमालेने झाकाळला असला म्हणून काही चंद्र नाहीसा होत नसतो, तो असतोच. मेघमालेच्या पलीकडे असलेले त्याचे अस्तित्व सूक्ष्मदृष्टीने पहावे लागते. म्हणूनच संतांनी सर्वांच्या अंतरी बसणारा देव पाहिला आणि त्यास आलिंगन दिले आपलेसे केले. ते परब्रह्मच सर्वांची माता. नामदेवाच्या अंतरीही तेच. म्हणून गोरोबाकाका नामदेवाच्या रूपाने ईश्वरालाच मायबाप जिवलगा म्हणून संबोधत आहेत.

**अभंग - १५**

नामा ऐसे नाम तुझिया स्वरूपा। आवरण आरूपा कोण ठेवी ।। १ ।।

तूं गुह्य चैतन्य नित्य वस्तु जाण रहित कारण स्वयंप्रकाश ।। २ ।।

याही शब्दामाजी वाचा न लागे। मार्ग पैंगा लागे निर्धारिता ।। ३ ॥

म्हणे गोरा कुंभार आत्मया नामदेवा विद्रूप अवघा दिससी साच ।। ४ ।।१५

हे नामदेवा, असे जे तुझे यथार्थ स्वरूप आहे, ब्रह्म चैतन्य रूप आहे, ते आवरणाने झाकून ठेवणे शक्य आहे काय? त्या शुद्ध रूपास अशुद्ध कुरूप करणे कोणास तरी शक्य आहे काय? अंतर्ज्ञान होताच माया भ्रांतीचे आवरण दूर होऊन वास्तवाचे ज्ञान होते, ते त्या गुह्य चैतन्य सत्तेस नित्य असे जाण. त्याचे कोणते कारण नाही, ते कोणाचे कार्यही नाही. ते स्वयंभू स्वयंप्रकाशी आहे. या स्वरूपाचे ज्ञान व अनुभूती घेण्यासाठी वाणी वा उपदेश उपयुक्त नाही. शब्दांचा व भाषेचा तेथे उपयोग नाही. मात्र, त्या मार्गावर चालणाऱ्याचा, ते स्वरूप जाणून घेण्याचा निर्धार आवश्यक आहे. गोरा कुंभार म्हणतो, हे नामदेवा, अंतर्ज्ञानी झाल्यानंतर मात्र तू हे जाणशील की हे सर्व आत्मरूपच आहे. तूच चिद्रूप, चैतन्यरूपी, शुद्ध चैतन्य, आहेस. तुझे ते रूपच तुला केवळ सत्य दिसेल. त्यानंतरच तुला तुझी खरी ओळख पटेल.

'तू कोण आहेस?' गोरोबांनी हा प्रश्न सर्वांना, मनुष्यमात्राला विचारला असून त्याचे उत्तरही त्यांनीच दिले आहे. ते असे, हे माणसा, तू देह नाहीस. पंचभूतांनी बनलेले तुझे शरीर म्हणजे तू नव्हेस. तू कारण आहेस,

कार्य नाहीस. स्वयंभू व स्वयंप्रकाशी तूच आहेस. अशरीरी, नित्य सच्चिदानंदस्वरूप, सूक्ष्मातिसूक्ष्म ब्रह्म असतांना तू स्वतःला मर्त्य शरीर, दुःखस्वरूप व स्थूल समजतो आहेस, केवढे हे अज्ञान! या अज्ञानातून मुक्त होऊन पाहा की तूच चैतन्यरूप व सत्य आहेस. मगच तुला तुझी खरी ओळख पटेल.

**अभंग - १६**

कासयास बहु घालिसील माळ । तुज येणेवीण काय काज ।। १ ।।

एकपणे एक, एकपणे एक। एकाचें अनेक विस्तारलें ।। २ ।।

एकत्व पाहतां शिणलें धरणीधर। न चुके येरझार संसाराची ।। ३ ।।

म्हणे गोरा कुंभार कोणी नाहीं दुजें । विश्वरूप तुझें नामदेवा ॥ ४ ॥[१६]

अरे भक्ता, गळयात ही माळ कशाला घालतोस? माळ, गंध, टिळा या सर्व बाह्य साधनांची तुला गरज आहे काय? हे नसतील, तर तुझे काही अडणार आहे काय? अरे, भक्ती म्हणजे हृदयातील भगवंताला जपणे होय. त्याच्याशी एकरूप होण्याचे नाव, म्हणजे भक्ती. तुला किंवा कोणालाही एकत्वाची जाणीव अशी व्हावी की, एकच ब्रह्म व केवळ तेच असून त्या एकत्त्वातूनच अनेकत्वाचा विस्तार झालेला आहे. त्या मूळ एकत्वरूपाची ओळख करून घेण्यासाठी, धरणीधर शक्तिशाली सम्राट आणि परम योगीही शिणले, थकले, पण त्यांना जन्ममरणाची येरझार चुकली नाही. गोरा कुंभार म्हणतो, हे नामदेवा, तू दुसरे कोणी नसून तेच विश्वरूप आहेस, तूच मूळ चैतन्य, ब्रह्मरूप आहेस, म्हणून हे सर्व दृश्यमान विश्व तत्वतः तुझेच रूप आहे.

माळ, गंध, • टिळा ही सर्व भक्तीची बाह्य साधने आहेत. अंतरीची शुद्धता मनाची निर्मळता, स्वतःच्या यथार्थ रूपाची जाणीव होणे, याद्वारे जन्म मरणाच्या चक्रातून, चौऱ्यांशीच्या फेऱ्यातून सुटका होऊ शकते. अनेकत्व पाहिल्यास मुक्ती नाही. विश्वरूप माझे आहे, हीच जाणीव हवी. संत नामदेव हा गोरोबांचा सखा, भक्तिमार्गाचा सांगाती. म्हणूनच गोरोबा नामदेवास ज्येष्ठ सखा या नात्याने मूळ तत्त्वाची स्वरूपाची ओळख करून देत आहेत.

**अभंग १७**

देवा तुझा मी कुंभार। नासी पापांचे डोंगर ।। १ ।।

ऐशा संततें हो जाती। घडे साधूची संगती ।। २ ।।

पूर्ण कृपा भगवंताची । गोरा कुंभार मागे हेचि ।। ३ ।।[१७]

हे देवा! हे देवराया! मी गोरा कुंभार तुझा आहे, केवळ तुझाच आहे. तुझे सामथ्य असे की पापांचे डोंगर कितीही मोठे असोत, तू ते ध्वस्त करतोस. या जगात पापांच्या राशींनी मला वेढले आहे, पीडले आहे, मी दुःखाने, पापांनी गांजलो आहे. या सर्वांपासून मला मुक्त करण्यासाठी हे देवा, मला साधूंची, संतसज्जनांची संगती सदा मिळो. तसेच हे कृपावंत देवराया, या गोरा कुंभाराचे मागणे येवढेच की तुझ्या पूर्ण कृपेचा लाभ मला घडावा. संत गोरा कुंभार यांचा हा अभंग एका अर्थाने वेगळा आहे. यात त्यांनी भगवत्कृपा व साधुसंगतीची महती वर्णिली आहे. त्यांच्या इतर अभंगांमध्ये एकत्वरूपाचे, जीव ब्रह्म ऐक्याचे तत्त्व आधारभूत मानलेले असल्याचे स्पष्टपणे दिसते. अद्वैत किंवा जीव ब्रह्म ऐक्यामध्ये कृपेला स्थान नाही. कृपेसाठी भक्त आणि भगवंत यांचे द्वैत आवश्यक आहे, ते या अभंगात आधारभूत आहे, तो कृपाळू भगवंत पापहारी आहे. दुःखी, कष्टी जनांना धीर देणारा आहे. त्यांना सहाय्य करणारा आहे. साधू सज्जनांची संगती यातूनही पाप व दुःखे नाश पावतात. दीनांचा कैवारी तो देव भक्तांचे मागणे पुरे करतो. मात्र, यासाठी त्याच्या कृपेवर पूर्ण विश्वास, पूर्ण निष्ठा असावी लागते.

**अभंग - १८**

श्रवण नयन जिव्हा शुद्ध करी। हरीनामें सोहंकरी सर्व काम ।। १ ।।

मग तुझा तूंचि दिवटा होसीगा सुभटा। मग जासील वैकुंठा हरिपाठें ।। २ ।।

रामनाम गणिका तरली अधम अजामिळ परम चांडाळ दोषी ॥ ३ ॥

म्हणे गोरा कुंभार विठ्ठल मंत्र सोपा। एक वेळा बापा उच्चारी रे ।। ४ ।।[१८]

पुराणातील कथेनुसार जीवंती नामक वेश्येचा भगवद्भक्तीमुळे उद्धार होऊन तिला मोक्षप्राप्ती झाली. मृत्युसमयी ती आपल्या पोपटाला रामनाम शिकवीत होती. त्याचे पुण्यफळ म्हणून तिला मोक्षप्राप्ती झाली. अजामिळ हा कान्यकुब्ज (आताचे कन्नौज, उत्तरप्रदेश) नगरीत राहणारा एक ब्राह्मण, एका वेश्येच्या नादी लागून आई वडील, पत्नी यांना टाकून पुढे पतित व दुराचारी झाला. वेश्येपासून त्याला दहा मुले झाली. सर्वांत धाकट्या मुलाचे नाव नारायण होते. मृत्युसमयी अजामिळाने त्यास नारायण म्हणून हाक मारली. त्यावेळी अजामिळास नेण्यासाठी आलेल्या यमदूतात व विष्णुदूतांत वाद झाला. नारायण नामोच्चारामुळे तो विष्णुभक्त ठरला, म्हणून त्यास वैकुंठप्राप्ती झाली, अशी पुराणकथा आहे.

हे नामदेवा! श्रवण, नयन, जिव्हा आदी ज्ञानेंद्रिये कर्मेंद्रिय, शुद्ध करून, दोषरहित करून हरिनामाचा जप करीत मीच तो कर्ता, करविता मीच, असा भाव मनात ठेवून सर्व कामे करावीत. मग, हे सज्जना! अंधारात प्रकाश देणारा दिवा तुझा तूच होशील. तूच तुझा मार्गदर्शक होशील. हरिनामाचा जप व निष्काम कर्म करीत तू वैकुंठास जाशील. नामदेवा! राममानाचा महिमा असा की जीवंती नावाची ती अधम गणिका (वेश्या) हरिनामकृपें तरली. तसेच अजामिळ नावांचा दुष्ट, दुराचारी, पतित ब्राह्मण, पण मृत्युसमयी नारायण नामोच्चरामुळे यमदूतांच्या तावडीतून सुटून वैकुंठास गेला. गोरा कुंभार म्हणतो, विठ्ठलनामाचा हा मंत्र अतिशय सोपा आहे. त्याचा महिमा मोठा आहे. एकवेळ तरी या कल्याणकारी मंत्राचा उच्चार करून पहा. अशी मायबापहो, माझी विनंती आहे. एकवेळा उच्चारा रे, 'तुमचेही कल्याण होईल.'

**अभंग – १९**

रोहिदासा शिवराईसाठी दिली पुंडलिका भेटी ।। १ ।।

पुंडलिका झाला अनुताप । धन्य सत्य गुरु माय बाप ।। २ ।।

जन्मा येऊनिया काय केली करणी। व्यर्थ शिणविली जननी ।। ३ ।।

नऊ महिने ओझें वागवून नाहीं गेला तिचा शीण ।। ४ ।।

ऐसा झालों अपराधी । क्षमा करा कृपानिधी ।। ५ ।।

ऐसा पुंडलिका भाव । उभा केला पंढरीराव ।। ६ ।।

भक्त पुंडलिकासाठी । उभा भिवरेच्या तटी ।। ७॥

कटावरी ठेऊनी कर । उभा विटेवरी नीट ।। ८ ।।

ऐसा भाव धरी म्हणे गोरा तीर्था जा फजितखोरा ।। ९ ।।१९

भक्त रोहिदासाची ऐहिक गरज व भक्तिभाव पाहून देवाने त्यास मोहरा भरलेली एक थैली एका साधूच्या वेषात येऊन दिली, अशी आख्यायिका आहे. तसेच भक्त पुंडलिक यासही देवाने दर्शन दिले. त्यांचे केवढे हे सद्भाग्य ! पुंडलिकाने आरंभी एका वेश्येच्या नादी लागून आपल्या आईबापाची घोर उपेक्षा केली, पण नंतर त्याला आपल्या दुष्कृत्याचा पश्चात्ताप झाला. त्यास हे सत्य कळाले की गुरू, आई आणि बाप हेच सत्य आहेत. त्यांची सेवा हाच परमश्रेष्ठ धर्म. पुंडलिकास पश्चात्ताप होऊन त्याच्या मनास अशी जीवणी लागली की जन्मास येऊन काय केले मी!

मातेने मला नऊ महिने उदरात वागविले, पण तिचा शीण मी घालवू शकलो नाही. तिची सेवा केली नाही. केवढा घोर अपराध माझ्या हातून घडला? 'केवढा अपराधी मी? हे कृपानिधी देवराया, मला क्षमा कर, असे पुंडलिक वारंवार म्हणू लागला. पुढे त्याने आई वडिलांची अनन्यभावे व इतक्या निष्ठेने सेवा केली की देव प्रसन्न होऊन पुंडलिकाच्या भेटीसाठी त्यांच्या दारी आला, पण पुंडलिक आपल्या आईवडिलांच्या सेवेत मग्न असल्यामुळे त्याने देवास सांगितले 'मी माझ्या आईवडिलांच्या सेवेत गुंतलो आहे. माझी सेवा पूर्ण होईपर्यंत तू उभा रहा' देव तरी किती कृपाळू! भक्तांचा किती कनवाळू भक्त पुंडलिकाने उभा राहण्यासाठी सरकवलेल्या विटेवर चंद्रभागा नदीच्या तीरावर उभा राहिला. कटीवर दोन्ही हात ठेवून उभे राहिलेले ते ध्यान किती मनोहारी! गोरा म्हणतो, अरे. फजितखोरा! अरे अज्ञानी भक्ता! इकडे तिकडे फिरून वारंवार आपली फजिती कशाला करून घेत आहेस? अरे अज्ञानी माणसा ! पुंडलिकासारखा सेवाभाव, त्याच्यासारखी भक्ती हृदयी घर, म्हणजे अवमानाचे व निराशेचे प्रसंग येणार नाहीत.

**अभंग - २०**

निर्गुण रूपडे सगुणाचे बुंधी विठ्ठल निवृत्ति प्रवृत्ति दिसे ।। १ ।।

एक पुंडलिक जाणे तेथील पंथ । तुझा आम्हां चित्त भाग्य योगें ।। २ ।।

सभाग्य विरळे नामापाठी गेले अभागी ते ठेले मौन्य जप ॥ ३॥

म्हणे गोरा कुंभार नामया भोगितां । उरल्या उचिता सेवूं सुखें ।। ४ ।।[२०]

निर्गुणाचे मोहक सुख, त्याचे गोंडस रूप सगुणाच्या आच्छादनाखाली दडपले आहे. सगुण बाह्यावरण दूर सारल्यास निर्गुणाचे सुंदर मुख आपोआप दिसते. याच ओळीत दुसरा विचार असा सांगितला आहे की विठ्ठलाच्या भक्तिमार्गात प्रवृत्ती आणि निवृत्ती, दोहोंचा सुरेख संगम झाला आहे. संसारात रममाण होऊन सुख उपभोगणे आणि पुन्हा त्यापासून विरक्त होऊन निवृत्ती अवलंबिणे, या दोन्ही मार्गांचा विठ्ठलभक्तीत समावेश आहे. एकटा भक्त पुंडलिकच जाणतो की प्रवृत्ती आणि निवृत्तीचा मार्ग कसा आहे, आणि त्यावर वाटचाल कशी करावी. हे कौशल्य त्यालाच साधले आहे. हे नामदेवा! तुझ्या आणि माझ्या वित्तास या दोन्ही मार्गांचे ज्ञान होण्याचे आपल्या भाग्यात असेल तरच योग येईल. हे सद्भाग्य काही विरळ्या लोकानाच, किंबहुना काही भाग्यवंतांना मिळते. असे विरळे सद्भाग्य कित्येकांना हरिनामामुळे प्राप्त झाले. जे अभागी आहेत त्यांना एकच उपय, मौन राहून जप करीत राहावे, थांबावे. गोरा कुंभार म्हणतो, हे नामदेवा, आपण हरिनाम भजन करीत राहू आणि जे उचित व इष्ट पुण्य पदरी पडेल, त्याचे फळ सुखाने, आनंदाने भोगीत राहू.

सगुण सत्य असते. इंद्रियगम्य असते, पण ते केवळ आवरण असते. ते आवरण दूर सारल्यावर निर्गुणाची आनंदमय अनुभूती येते. विठ्ठलभक्ती केवळ विरक्तीची नव्हे, तर प्रवृत्ती शिकवण देते. पण त्यातच गुंतून न राहता त्यापासून निवृत्ती हीच विठ्ठलप्रत नेऊ शकते. हरिनाम हे साधन आहे पुण्यप्राप्तीचे. त्याचे सुख मौन जप करीत राहिल्याने भोगता येते. पुण्यवंत व भाग्यवंत असे जे सद्भक्त असतात ते संख्येने कमीच असतात. इतरांनी मात्र नामजपाचा आनंद उपभोगावा, हाच त्यांच्यासाठी सुखाचा मार्ग, भक्त पुंडलिकाने आरंभी जो प्रवृत्तिमार्ग स्वीकारला तो प्राणिमात्राच्या स्वभावानुसारच. पण नंतर मात्र त्यास उपरती झाली व हरिनाम कृपेने त्याने निवृत्तिमार्ग अंगीकारला.

**************************************************************************************************

**संदर्भ टिपा:**


१. प्रा. वेदालंकार वेदकुमार, म्हणे गोरा कुंभार (संक्षिप्त चरित्र व सार्थ अभंग संग्रह), विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृ.२५.

२. तत्रैव, पृ. २६.

३. तत्रैव, पृ. २७.

४. तत्रैव, पृ. २८.

५. तत्रैव, पृ. ३०.

६. तत्रैव, पृ. ३१.

७. तत्रैव, पृ. ३२.

८. तत्रैव, पृ. ३३.

९. तत्रैव, पृ. ३४.

१०. तत्रैव, पृ. ३५.

११. तत्रैव, पृ. ३६.

१२. तत्रैव, पृ. ३७.

१३. तत्रैव, पृ. ३८.

१४. तत्रैव, पृ. ३९.

१५. तत्रैव, पृ. ४०.

१६. तत्रैव, पृ. ४१.

१७. तत्रैव, पृ. ४२.

१८. तत्रैव, पृ. ४३.

१९. तत्रैव, पृ. ४४.

२०. तत्रैव, पृ. ४६.

# प्रकरण चौथे

# उपसंहार

# प्रकरण चौथे

## उपसंहार

महाराष्ट्राला संतांची पुरातन परंपरा आहे. या संतांनी महाराष्ट्राला व मराठी भाषेला वाङ्मयाचा मोठा वारसा दिला आहे. निवांत वेळी आपली कामे आटपून माणसाने भगवंताचरणी लीन व्हावे. चांगले आचरण करावे. भेद भाव टाळावा. संत तुकाराम महाराज यांच्या अभंगात ४०० वर्षांपूर्वी आपल्याला त्यांनी पर्यावरणाचा संदेश दिला आहे. संत ज्ञानेश्वरांनी सामान्य जनतेला कळेल अशा भाषेत गीता ओव्या लिहिल्या. गोरा कुंभार, चोखामेळा एकनाथ महाराज यांसारख्या संतांनी आपल्या रोजच्या जीवनतील दाखले देत जनमानसाच्या मनावर संस्कार केले.संताची चळवळ हा भारतातील प्रबोधनकाळ समजला जातो. वारकरी चळवळीचा मराठी लोकजीवनावरील झालेला विलक्षण प्रभाव आजही अबाधित आहे. तसाच तो मराठी साहित्यावरही आहे. त्यामुळे वारकरी चळवळ किंवा संत साहित्य याचा सतत नव्याने अभ्यास होत राहिला आहे. मध्ययुगीन काळातील संतांनी समता, प्रेम, आदर, सहिष्णुता, दान आणि देवाची भक्ती या गुणांचा प्रचार केला. संतांना अध्यात्मिक मार्गदर्शक मानले जात होते, अशा काळात तेर येथील श्री संत गोरा कुंभार यांनी आपल्या भक्तिभावाने मनाजाला भक्तिरसात वाहुन नेण्याचे काम केले. आपल्या अभंगाद्वारे समाजाला भक्तीचा संदेश दिला त्यांच्या विषयी पुढील कथा सांगितली जाते.

ही गोष्ट संत गोरा कुंभार यांची आहे. ते रंगाने गोरे होते व त्यांचा व्यवसाय कुंभाराचा होता. एके दिवशी गोरा कुंभार विठ्ठल भक्तीत मग्न मडके बनविण्यासाठी माती तयार करत होते. त्यांची बायको संताई पाणी आणण्यासाठी जात होती. त्यांनी मुलाला दोरीने बांधले व संत गोरा कुंभारांना मुलावर लक्ष्य ठेवण्यास सांगितले. गोरा कुंभारांनी संताई हिचे बोलणे ऐकून घेतले व पुन्हा विठ्ठल भक्ती मध्ये लीन झाले.

त्यांचा लहान मुलगा त्याच्या वडिलांकडे पाहत होता आणि हळू हळू तो त्या ओल्या मातीकडे येत होता. काही क्षणात मुलगा मातीमध्ये आ.ला पण विठ्ठल भक्तीमध्ये लीन असलेल्या गोरा कुंभारांना याचे भान देखील नव्हते. हळू हळू मुलाचे सर्व शरीर त्या मातीमध्ये आले. थोड्या वेळाने त्यांची पत्नी पाणी घेऊन परत येते. परत आल्यानंतर त्यांनी पहिले मुलगा त्याच्या जागी नव्हता. त्यांना वाटले दोरी सुटली असेल व मुलगा जवळपास गेला असेल. पण ती दोरी चिखलात गेलेली दिसली व तो चिखल गोरा कुंभार तुडवत होते. संताई ने पाहिले मुलाच्या खेळण्याचा थोडा भाग चिखलात रुतलेला होता.

संताई ने घाबरून संत गोरा कुंभार यांना विचारले माझे मूल कुठे आहे. मग्न भक्तीतून बाहेर येऊन संत गोरा कुंभार यांनी पहिले, तर ते हैरान झाले. त्यांना पश्चाताप झाला. कारण त्यांचा मुलगा त्यांच्याच पायाखाली चिखलात तुडवला गेला होता. चिखल लालसर झाला होता. संताई ने विचारले आपला मुलगा तुमच्या पायाखाली आहे, याचे ध्यान पण नाही राहिले तुम्हाला? तुम्ही तुमच्या मुलाचाच जीव घेतला. संताईने टाहो फोडण्यास सुरवात केली. तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.

“हे विठ्ठला काय घडले हे माझ्या कडून”, असे म्हणत संत गोरा कुंभार यांनी डोक्याला हात लावला. त्यावर संताई बोलली "कसले वडील आहेत तुम्ही, असली कसली भक्ती आहे तुमची काय भेटले तुम्हाला भक्ती करून, तुमच्या भक्तीपायी माझा मुलगा गेला, तुम्हाला समजत नाही पण तुमच्या विठ्ठलाला देखील समजत नाही का? का जीव घेतला विठ्ठलाने माझ्या मुलाचा, धिक्कार असो अश्या भक्तीचा आणि अश्या देवाचा." विठ्ठलाबद्दल अशी अपमानकारक शब्द ऐकून संत गोरा कुंभार यांना राग आला व त्यांनी आपल्या पत्नीला मारण्यासाठी हात उचलला. तेवढ्यात संताई बोलल्या, "मला हात लावू नका. तुम्हाला तुमच्या विठ्ठलाची शपथ आहे." हे शब्द ऐकून गोरा कुंभार यांनी त्यांचा हात थांबवला. या घटनेनंतर त्यांच्या कुटुंबामध्ये शोककळा पसरली.

ज्या दिवसापासून संताई ने गोरा कुंभार यांना शपथ दिली. त्यादिवसापासून त्यांनी संताईला स्पर्श देखील केला नव्हता आणि संताईने बनवलेले जेवण सुद्धा घेण्यास मनाई केली. गोरा कुंभार त्या दिवसापासून खूप दुःखी राहू लागले. त्याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर देखील झाला. ते कोणाशी जास्त बोलत नसत. इकडे संताईची पण तीच परिस्थिती होती मुलगा सोडून गेला आणि नवराही बोलत व स्पर्श देखील करत नव्हता. संताईने विचार केला, जे व्हायचे ते झाले. माझा मुलगा मला सोडून गेला व माझे पती देखील मला स्पर्श करत नाहीत. कुळ पुढे वाढवण्यासाठी त्यांच्या वडिलांशी बोलून संत गोरा कुंभार यांचा विवाह त्यांच्या लहान बहिणीशी केला. पण दुसऱ्या लग्नानंतरही संत गोरा कुंभार हे खूप दुःखी असत आणि दुसऱ्या पत्नीलाही ते स्पर्श करत नव्हते. या काळजीने दोन्ही बहिणी खूप दुःखी होत्या.

एके दिवशी त्या दोघी संत गोरा कुंभार यांच्या दोन्ही बाजूला झोपल्या. संत गोरा कुंभार स्वप्नातही पांडुरंगाच्या भक्तीत मग्न होते. स्वप्नात त्यांनी दोन्ही हात विठ्ठलाच्या भेटीसाठी पुढे केले आणि प्रत्यक्षात त्यांचे दोन्ही हात त्यांच्या दोन्ही बाजूला झोपलेल्या पत्नीला लागले. या स्पर्शाने ते जागे झाले व त्यांना पश्चताप झाला. विठ्ठलाची शपथ मोडली. हे सर्व या हातांमुळे झालं असे बोलत त्यांनी स्वतःचे हात मनगटापासून पुढे छाटून टाकले. त्यांच्या कुटुंबावर पुन्हा एक नवीन संकट ओढवल.

पुढे काही दिवसांनी त्यांच्या घरी एक जोडपे काम मागण्यासाठी आले. त्यांचे नाव विठोबा होते. राहण्यासाठी जागा आणि जेवण द्या, बदल्यात ते सर्व त्यांच्या घरातील काम करतील, असे ते म्हणाले. "जशी पांडुरंगाची इच्छा" असे म्हणत संत गोरा कुंभार यांनी त्यांना राहण्याची परवानगी दिली. पुढे विठोबाने संत गोरा कुंभाराचे सर्व काम सावरले. त्याने अत्यंत सुंदर असे खूप मडकी बनवली. ज्याने संत गोरा कुंभार यांचा व्यवसाय पुन्हा सुरळीत चालू झाला. त्याच दरम्यान पंढरपूर आषाढी वारी जवळ अली होती. विठोबाच्या सांगण्यावरून संत गोरा कुंभार विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूर ला जाण्यासाठी तयार झाले.

वाटेवर एके ठिकाणी संत नामदेव काही वारकऱ्यांसोबत विठ्ठल कीर्तन करत होते. सर्व वारकरी दोन्ही हाताने टाळया वाजवत "जय जय राम कृष्ण हरी" म्हणत होते. असे अतृप्त आणि अलौकिक वातावरण पाहून संत गोरा कुंभार ही उत्सुकतेने गाऊ लागले आणि टाळया वाजवण्यासाठी आपले हात उचलले आणि तश्याच तुटलेल्या हातांनी टाळया वाजवू लागले. अशी अदभूत भक्ती पाहून श्री विठ्ठलाच्या कृपेने पाहता पाहता संत गोरा कुंभार यांचे हात परत आले. पांडुरंगाची अशी अद्वितीय लीला पाहून सर्व वारकरी आणि स्वतः संत गोरा कुंभार आश्चर्यचकित होऊन पाहू लागले.

कीर्तन संपल्यानंतर संत गोरा कुंभार यांना विठोबा कुठेच दिसत नव्हते. त्यांनी विठोबाला आणि त्याच्या पत्नीला आसपास खूप शोधले पण त्यांना ते जोडपे नाही सापडले. निराश होऊन संत गोरा कुंभार पंढरपूरच्या दिशेने रवाना झाले. पंढरपूरला पोहचताच संत गोरा कुंभार आणि त्यांच्या पत्नीने मंदिरात जाऊन श्री. विठ्ठलाचे दर्शन घेतले. पांडुरंगाच्या मूर्ती मध्ये संत गोरा कुंभार यांना विठोबाचे दर्शन झाले. गोरा कुंभार यांना कळून चुकले की, त्यांना मदत करणारे दुसरे कोणी नसून स्वतः श्री. विठ्ठल आणि माता रुक्मिणी होत्या.

**यात्रा:**

तेर येथे दरवर्षी चैत्र महिन्याच्या कृष्ण पक्षात मोठी यात्रा भरते. तेर येथील श्री. गोरा कुंभार यांच्या मंदिराजवळ ही यात्रा भरते. संत गोरा कुंभार यांची यात्रा म्हणून देबील यास ओळखले जाते. जवळपास ७ - ८ दिवस ही यात्रा असते. खूप मोठ्या संख्येने लोक येथे येतात.

संत गोरा कुंभार हे आध्यत्मिकदृष्ट्या संतपदाला पोहोचलेले होते. पंढरपूरच्या विठ्ठलाचे ते अनन्यसाधारण भक्त होते. गोराबा हे संत मंडळींमध्ये वयाने सर्वांहून वडील होते. त्यांना सर्व जण गोरोबाकाका म्हणत असत. संत गोरोबाकाका यांना संत परीक्षक म्हटले जाते. त्यासाठी त्यांच्या जीवनातील एका घटनेचा

वृत्तांत सांगणे आवश्यक आहे. एकदा गोरोबाकाकांनी सर्व साधु-संतांना आपल्या घरी बोलवावे. त्यांनी प्रत्येक संतांच्या घरी जाऊन विनंती केली की "आपल्या पदरजाने माझा आश्रम पवित्र करावा." गोरोबांच्या विनंतीला मान देऊन सर्व संत त्यांच्या घरी आले. संतदर्शनामुळे गोरोबांना मोठा आनंद झाला. त्यांना सर्वांचा योग्य तो आदरसत्कार करून गरिबाघरचे सत्विक अन्न वाढून उत्तम समाधान केले. त्यानंतर झालेल्या संतसभेच्यावेळी संत ज्ञानदेव, निवृत्तीनाथ, सावता माळी, सोपानदेव, नामदेव, मुक्ताबाई आदी संतमंडळी एकत्र बसली असताना ज्ञानदेव म्हणाले 'गोरोबाकाका, आज तुम्ही आपल्या घरी जे घट जमविले आहेत, त्यात पक्के घट कोणते आणि कच्चे कोणते, याची परीक्षा करून काय निर्णय असेल, तो सांगा, ज्ञानदेवाच्या या आज्ञेचा गर्भितार्थ गोरोबांच्या तत्काळ ध्यानी आला. त्यांनी हातात थापटी घेतली आणि ते प्रत्येक संताच्या मस्तकावर हाणत चालले. थापटीचा आघात नामदेवाशिवाय सर्व संतांनी निमूटपणे सहन केला. जेव्हा गोरोबा नामदेवाजवळ आले तेव्हा नामदेव म्हणाले 'काका, तुम्ही हा काय उद्योग चालविला आहे? आदर-सत्काराची ही कोणती तऱ्हा?' नामदेवाचे हे बोलणे ऐकून सर्व संत हसले. तेव्हा गोरोबांनी नामदेवाकडे बोट दाखवून ज्ञानदेवास सांगितले 'हा एवढा एक घट मात्र कच्चा आहे.' तेव्हा मुक्ताबाई गोरोबांस म्हणाली 'काका, तुम्ही केलेली परीक्षा अगदी बरोबर आहे.' हे ऐकताच सर्व संतांच्या मुखावर हास्य प्रकटले नामदेव मात्र मनात फार ओशाळले.

पंढरपुरी वास्तव्य असल्यामुळे आणि श्री. पांडुरंगाच्या सतत सानिध्यात असल्यामुळे नामदेवास किंचित गर्व झाला. ज्ञानदेवादी बंधूनी श्री. विठ्ठलास नमस्कार केला. तसा नामदेवासही केला. मात्र नामदेवाने त्यांना उलट नमस्कार केला नाही. 'मी पांडुरंगाजवळ असतो. मला जसे विठ्ठलाचे सानिध्य आहे, तसे या वधूंना कोठे आहे? मी मात्र त्यांना उलट नमस्कार करणार नाही' नामदेवाचे हे औद्धत्य व अहंकार पाहून मुक्ताबाईने सर्व संतमंडळींना एकत्र बोलाविले व तेथे गोरोबांकडून सर्व संतांची व नामदेवाची परीक्षा करविली. त्या परीक्षेत ते कच्चे घट ठरले.

वरील परीक्षेत कच्चे घट ठरल्यानंतर झालेल्या अपमानाने नामदेव फार कष्टी झाले. त्यांनी पंढरपुरी जाऊन पांडुरंगास सर्व हकीकत सांगितली. हकीकत ऐकून देव म्हणाला 'नामदेवा, गोरोबांनी जी परीक्षा केली, ती अगदी बरोबर आहे. जो मनुष्य सद्‌गुरुला शरण गेला नाही, तो केवढाही मोठा व्युत्पन्न आणि भक्तिमान असला तरीही तो कच्चाच आहे, असे म्हटले पाहिजे' भगवंतांचे हे वचन ऐकून नामदेव अगदी विरघळून गेले. म्हणाले 'देवा, माझ्या अपमान दुखाःचा तू परिहार करशील, अशा भावनेने मी तुझ्याजवळ आलो. पण तूही गोरोबांच्या म्हणण्याचाच अनुवाद करतोस. आता पुढे मी करावे तरी काय?" देव म्हणाले, 'तू आता सद्‌गुरुला शरण जाऊन त्यांचा उपदेश घे, म्हणजे तुला अद्वैताचे खरे रहस्य काय आहे, ते कळेल'. त्याप्रमाणे पुढे नामदेवाने औंढा नागनाथ येथे जाऊन विसोबा खेचर यांच्याकडून उपदेश घेतला व इतर संत समुदायात पक्के घट म्हणून प्रवेश करण्याचा अधिकार संपादन केला. या कथेवरून लक्षात येते की तत्कालीन संतमंडळीत गोरोबांची योग्यता फार मोठी होती.

# संदर्भ सूची

# संदर्भ सूची


१. प्रा. वेदालंकार वेदकुमार, म्हणे गोरा कुंभार (संक्षिप्त चरित्र व सार्थ अभंग संग्रह), विद्याभारती प्रकाशन, लातूर.

२. अभ्यंकर शंकर, वारकरी संप्रदाय.

३. डॉ. मुकुंद दातार, वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी.

४. संपा. दांडेकर शं. बा., वारकरी भजन संग्रह.

५. संपा. डॉ. मोहिते शिवाजीराव, वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य.

६. बहिरट, भालेराव, वारकरी संप्रदाय-उदय आणि विकास.

७. डॉ. विकास कदम, वारकरी संप्रदायाचा इतिहास आई पंढरपुरातील फड व माथांचे कार्य.

# परिशिष्ट

# छायाचित्रे



श्री. संत गोरोबा काका



श्री. संत गोरोबा काका यांचे तेर येथील मंदिर व परिसर




श्री. संत गोरोबा काका यांचे तेर येथील मंदिर